**जनतेत क्षोभ उत्पन्न करण्यापेक्षा तिच्यात विचार उत्पन्न करणे हे कितीतरी महत्त्वाचे आणि कठीण कार्य आहे - तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी**

# फेरविचार

'अर्थबोधपत्रिके'च्या या अंकातील लेखांमधून अवचितच एक सूत्र विणले गेले आहे. हे काहीही हेतूतः केलेले नाही. कोणत्याही प्रकारचे 'डिझाइन' तर त्यामागे अजिबातच नव्हते. एखाद्या विशिष्ट विषयाला वाहिलेली काही पाने एकाआड एक अंकात देण्याचा प्रयत्न गेली सुमारे दोन वर्षे चालू आहे. त्या मालिकेतीलही हा अंक नाही. तरीही, विविध लेखांमधून एक सूत्र उलगडत जाते. हे सूत्र आहे फेरविचाराचे. अनेक वर्षे एखादी गोष्ट एकाच प्रकारे केल्यानंतर, एखादे धोरण वर्षानुवर्षे एकाच पद्धतीने राबविल्यानंतर परिस्थितीच अशी उद्भवते की आजवरच्या सगळ्याच परिपाठाचा फेरविचार अनिवार्य बनतो. चीन आणि अमेरिका या आजच्या जगातील दोन महासत्ता आज नेमक्या त्याच 'फेज'मधून मार्गक्रमण करीत आहेत. आर्थिक पुनर्रचनेच्या कार्यक्रमाला चीनने १९७८-७९मध्ये हात घातला. परंतु, या पुनर्रचनेला राजकीय व्यवस्था-प्रणालीच्या पुनर्मांडणीचे जे कोंदण पुरविणे आवश्यक होते त्या दिशेने मात्र चीनने तसूभरही हालचाल केली नाही. यातून तिथे जी एक घुसमट तयार झाली तिचा हिंसक विस्फोट १९८९ साली तिआनमेन चौकात घडून आला. चिनी सत्ताधीशांनी बळाचा बेगुमान वापर करून नेहमीच्या लष्करी खाक्याने तो दडपून टाकला. लोकमताला वाव न देण्याचा परिपाठ चीनने पुढे तिबेट आणि आता अगदी अलीकडे शिनझियांग प्रांताबाबतही 'व्रतस्थ'पणे पाळलेला दिसतो. मात्र, हे असेच कोठवर चालेल, यांबाबतचा फेरविचार चीनला करावाच लागेल, असे काहींचे मत आहे. चिनी परराष्ट्रधोरणाच्या आखणीवर आजच जाणवणारा लोकभावनेचा प्रभाव उद्या धोरणआखणीत अधिक वेगळ्या प्रकारे प्रतिबिंबित होण्याजोगे वातावरण तिथे तयार होईल का, यांबाबत तज्ज्ञांमध्ये सुरू असलेली जी चर्चा या अंकात मांडलेली आहे ती या संदर्भात मननीय ठरते. तीच बाब अमेरिकेची. आंतरराष्ट्रीय राजकारणात 'बिग् ब्रदर'ची भूमिका अमेरिकेच्या जणू अंगवळणीच पडून गेलेली आहे. मात्र, या भूमिकेबाबतही अमेरिकेला फेरविचार करावाच लागेल, असा सूर खुद्द अमेरिकेतीलच परराष्ट्रधोरणविषयक विश्लेषकांमधून आता उमटताना



दिसतो. लॅटिन अमेरिकेबाबतचे अमेरिकी परराष्ट्रधोरण त्याची 'लिटमस् टेस्ट' ठरेल, असे प्रतिपादन करणारा लेख फेरविचाराचेच सूत्र पुढे नेतो. केवळ राजकीय व्यवस्था-प्रणाली वा परराष्ट्रधोरणाच्या प्रांतातच नाही तर, आर्थिक क्षेत्रातही हाच फेरविचार सर्वच देशांना या पुढील काळात करावा लागणार आहे तो सेवानिवृत्तांना अदा करावयाच्या निवृत्तिवेतनादी लाभांच्याबाबतीत. सरासरी आयुर्मानात लक्षणीय वाढ घडून आल्याने, खास करून, श्रीमंत देशांमधील सरकारी तिजो-या निवृत्तिवेतनासह अन्य अनुषंगिक लाभांच्या भारापोटी दबत चालल्या आहेत. त्यामुळे, निवृत्तिवेतनाच्या प्रचलीत सरकारी सुविधेचा पुनर्विचार करण्यावाचून देशोदेशीच्या सरकारांना गत्यंतरच नाही. ज्येष्ठ नागरिकांचे एकूण लोकसंख्येतील वाढते प्रमाण ध्यानात घेता आता तर नगरनियोजनाचाही आपल्याला मुळातूनच नव्याने विचार करणे भाग आहे. असाच फेरविचार आवश्यक ठरतो आहे स्थलांतरासंदर्भात. दिवसेंदिवस फुगणा-या शहरी लोकसंख्येमध्ये स्थलांतरितांचा वाटा मोठा आहे. त्यामुळे ठिकठिकाणी द्वैताची लागणही मोठ्या प्रमाणात होताना दिसते. स्थलांतरितांविरुद्ध केवळ वातावरण तापविण्याने मूळ प्रश्न सुटत नाही. शहरी विस्ताराची विद्यमान प्रक्रिया आणि तिच्यात अंतर्भूत असलेली असमानता यांबाबत आम्ही काही मूलभूत फेरविचार करणार का, हा खरा सवाल आहे. पुनर्विचार अनिवार्य ठरत असलेल्या काही प्रांतांमधून मारलेला फेरफटका या अंकातील पानांत मांडलेला आहे. ■■

## निवेदन

- ज्या देश, प्रदेश, संस्था अथवा व्यक्तिनामांच्या इंग्रजी स्पेलिंगनुसारी अचुक मराठी उच्चारांसंदर्भात संदिग्धता जाणवते अशी नामे लेखांमध्ये देवनागरीत उद्धृत करण्याऐवजी रोमन लिपीमध्ये इंग्रजीतच दिलेली आहेत.
- लेखांमधील संदर्भांसाठी विश्वसनीय, अधिकृत अशा साइट्सच धुंडाळण्याचा कटाक्ष ठेवला जातो. तरीही, इंटरनेटवरून घेतलेल्या तपशीलाच्या यथार्थतेबाबत भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी हमी देऊ शकणार नाही. अशा मजकुराची जबाबदारीही संस्थेवर नाही, याची वाचकांनी कृपया नोंद घ्यावी.

राजकीय

# उत्कंठा चीनच्या परराष्ट्रधोरणाबाबतची...

आर्थिक विकासाच्या घोड्यावर (म्हणजे ड्रॅगनवर) स्वार झालेला चीन वेगाने दौडत आहे. चीनच्या घोडदौडीचे औत्सुक्य जगभरात अनेकांच्या मनी दाटले आहे तर त्यामुळे काही चिंताग्रस्तही बनले आहेत. साम्यवादाचे बोट न सोडलेला पण बाजारपेठेधिष्ठित अर्थव्यवस्थेत सहभागी होत असलेला चीन 'लोकशाही राष्ट्र' बनेल का, याचीही चर्चा आता चालू झालेली आहे. किंबहुना, बाजारपेठीय अर्थव्यवस्थेशी जुळवून घेणा-या चीनची वाटचाल लोकशाहीकडे होणे हा फक्त काही कालावधीचाच काय तो प्रश्न आहे, असेही म्हटले जाऊ लागले आहे.

चीनचे दरडोई सरासरी ठोकळ देशी उत्पादन चालू किंमतींना (average per capita gross domestic product) पाच हजार ते सहा हजार अमेरिकी डॉलर इतके झाले की चीनमध्ये राजकीयदृष्ट्या खुलेपणा येईल, असा अंदाज तज्ज्ञ मांडतात. चीनमधील हेच उत्पादन २०१०मध्ये तीन हजार अमेरिकी डॉलर तर २०२०मध्ये सहा हजार अमेरिकी डॉलर इतके वाढण्याची शक्यता वर्तविली जाते. अर्थात, सध्याचे जागतिक आर्थिक संकट पाहता याबाबत निश्चित काही अंदाज बांधणे कठीणच आहे. तरीदेखील येत्या दहा-पंधरा वर्षांत तेथे लोकशाहीच्या दृष्टीने काही पावले उचलली जातील, असाही काहींचा आशावाद आहे. त्यामुळे चीनमध्ये होऊ शकणा-या लोकशाहीकरणाचा चीनच्या परराष्ट्रविषयक धोरणांवर कसकसा परिणाम होऊ शकेल, हादेखील एक अभ्यासाचा विषय ठरतो आहे. तसेच, चीनमधील जनमानसाचा प्रभाव चीनच्या परराष्ट्र धोरणावर आजघडीला आहे किंवा कसे याबाबतही चर्चा होत आहे.

या संदर्भात या चर्चेला चौकट आहे ती 'डेमोक्रॅटिक पीस थिअरी' या सिद्धांताची. एखाद्या देशाचे परराष्ट्रविषयक धोरण या संदर्भात हा सिद्धांत महत्त्वाचा मानला जातो. लोकशाहीप्रधान राष्ट्रे सर्वसाधारणपणे युद्धखोर असत नाहीत असा या सिद्धान्ताचा सांगावा. लोकशाही पद्धतीने



सत्तेवर आलेले शासन हे देशातील सर्वसामान्य नागरिकांना जबाबदार असल्याने ते युद्धासारखा सर्वसामान्यांचे जीवन ढवळून काढणारा निर्णय जनतेवर लादण्याची शक्यता कमी असते, हा या सिद्धान्ताचा गाभा. शिवाय, जनमताचा रेटा युद्ध टाळण्याच्याच दृष्टीने असण्याची शक्यता अधिक संभवते. तसेच लोकशाही व्यवस्थेत युद्ध रोखणारे वा टाळणारे संस्थात्मक जाळेही निर्माण होऊ शकते/होत असते, असा मुद्दा याच्या समर्थनार्थ मांडला जातो. तर काहींच्या मते दर वेळी असे घडतेच असे नाही. मूळ 'डेमोक्रॅटिक पीस थिअरी' सर्वमान्य आहे असे नाही. या पार्श्वभूमीवरही चीनच्या परराष्ट्रविषयक धोरणांची चर्चा ('डेमोक्रॅटिक पीस थिअरी'च्या संदर्भात) काही अभ्यासकांनी केली आहे. त्यांच्या मते चीनमध्ये लोकशाहीकरणाची प्रक्रिया चालू झाली तरी काही मुद्यांबाबत चीन आक्रमक राहण्याचीच शक्यता नाकारता येत नाही.

साम्यवादी चीनचे अध्यक्ष हू जिंताओ यांनी चीनमध्ये 'समाजवादी लोकशाही' (socialist democracy) रुजावी, अशी आपली इच्छा असल्याचे अनेकदा म्हटले आहे. सरकारी कामकाजात पारदर्शकता यावी आणि निर्णयप्रक्रियेत नागरिकांचा सहभाग वाढावा, अशी अपेक्षाही जिंताओ यांनी व्यक्त केली आहे. पण, जिंताओ वा अन्य नेत्यांनी, विविध विचारसरणी पुढे आणणा-या व त्यानुसार मतदारांना पक्षनिवडीचे स्वातंत्र्य देणा-या बहुपक्षीय पद्धतीच्या बाजूने आजवर कधीच मत मांडलेले नाही. शिवाय, लोकशाहीशी संबंधित असे जे काही नागरी स्वातंत्र्य पाश्चिमात्य देशांना अपेक्षित आहे ते सामाजिक व राजकीय अस्थैर्य निर्माण करण्यास साहाय्यभूत ठरते, असे चीनमधील धोरणकर्त्यांना वाटते. शिवाय, आपल्या साम्यवादी पक्षाचा एकाधिकारही त्यांना टिकवायचा आहे. चीनची एकूणच व्यवस्था अशी आहे की चीनमधील नागरिकांना सरकारी यंत्रणेवर कोणत्याही प्रकारचा दबाव वा अंकुश आणता येत नाही वा सरकारने/प्रशासनाने दिलेल्या माहितीची शहानिशा करता येत नाही. चीनमधील प्रसारमाध्यमेदेखील याबाबत काही करू शकत नाहीत. सरकारच्या धोरणांचा ऊहापोह करण्याचे काम प्रसारमाध्यमांनी करायचे नसते; तर, सरकारचे म्हणणे तेवढे नागरिकांपर्यंत पोहचवायचे असते, एवढीच मर्यादित भूमिका माध्यमांकडून

तेथे अपेक्षित आहे. तरी अलीकडे तेथे अल्पसे बदल होत आहेत. सरकारी यंत्रणेतील भ्रष्टाचार उघडकीस आणण्याचे प्रयत्न वृत्तपत्रे करीत आहेत. काही घटनांमध्ये नागरिकांनी सरकारला न्यायालयांत उभे केले असून क्वचित कुठे नागरिकांच्या बाजूने निर्णय लागत आहेत.

चीनमध्ये लोकशाहीच्या दिशेने होणारी राजकीय हालचाल अलीकडे अल्प प्रमाणात दिसून येते. पक्षांतर्गत लोकशाहीसाठी साम्यवादी पक्षाकडून प्रयत्न होत आहेत. स्थानिक पातळीवर निवडणुका घेण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. अर्थात, निवडणुकीतील उमेदवार हे बहुतांशवेळा साम्यवादी पक्षाचेच असतात आणि राष्ट्रीय पातळीवरील धोरणांचीच 'री ओढणे' त्यांच्याकडून अपेक्षित असते. तरीदेखील चीनमध्ये लोकशाहीची स्थापना करायची झाल्यास वेगवेगळे राजकीय पक्ष जसे कार्य करतात तसे कार्य पक्षांतर्गत असलेले असे वेगवेगळे गट करू शकतील, असा अंदाज मांडण्यात येतो. थोडक्यात, सुधारणांची गती मंद असली तरी येत्या दोन-तीन दशकांत चीनमध्ये लोकशाहीकरणाच्या दिशेने पावले पडू शकतील असे म्हणण्याइतपत तरी वातावरण निर्माण होऊ लागले आहे. साम्यवादाच्या बंदिस्त चौकटीत आतापर्यंत हेही शक्य होईल असे वाटत नव्हते, त्यामुळे वर उल्लेखित घटना अभ्यासकांच्या लेखी महत्त्वाच्या ठरत आहेत.

चीनची वाटचाल लोकशाहीकरणाच्या दिशेने झाली तर चीनच्या परराष्ट्रधोरणावर त्याचे कोणते परिणाम होऊ शकतात, याचा विचार करण्याआधी चीनच्या आजच्या परराष्ट्रविषयक धोरणांवर चीनमधील नागरिकांचा प्रभाव पडतो आहे किंवा कसे याबाबत जाणून घेणे गरजेचे आहे. चीनमधील साम्यवादी पक्षाने 'आपण राष्ट्रवादी आहोत', अशी आपली प्रतिमा जनमानसात रुजविली आहे. तसेच चीनची सार्वभौमता कायम राखण्यात आपण यशस्वी झालो आहोत, असाही संदेश नागरिकांपर्यंत पोहचविला आहे. १८४२ ते १९४९ हा सुमारे शतकभराचा काळ व त्यातीलही प्रामुख्याने चीन-जपान युद्धाचा काळ (पहिले युद्ध १८९४-९५ आणि दुसरे युद्ध १९३७-४५) चीनसाठी मानहानीचा असल्याचे साम्यवादी पक्षाला वाटते. त्यामुळे चीनने आर्थिक विकास करून आपले सामर्थ्य वाढविले तर चीनवर मानहानीची वेळ पुन्हा येणार नाही, असे पक्षाच्या नेत्यांना वाटले. आपले



हेच मत नागरिकांपर्यंत पोहचवून देशाच्या आर्थिक विकासासाठी चिनी नागरिकांचा पाठिंबा मिळविण्यात साम्यवादी पक्ष यशस्वी झाला. आता लोकांच्या अपेक्षा पूर्ण करण्याची जबाबदारी पक्षावर येऊन पडली आहे.

सर्व प्रकारचे साधनस्रोत वापरून चीनने विविध प्रकारच्या संधी मिळवाव्यात आणि आर्थिक विकास करून घ्यावा, असे साधारणतः चिनी नागरिकांना वाटते. चीनची सार्वभौमता कायम राहावी, चीनचा भूभाग चीनच्याच अंमलाखाली असावा आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर चीनला आदर व प्रतिष्ठा मिळावी अशीही चिनी नागरिकांची अपेक्षा आहे. चीनमध्ये राष्ट्रवाद महत्त्वाचा ठरत असून आपल्या देशातील नागरिकांचा पाठिंबा मिळविण्यासाठी, आपली राष्ट्रवादी प्रतिमा आंतरराष्ट्रीय पातळीवर उभी करणे चीनमधील धोरणकर्त्यांसाठी गरजेचे बनले आहे. चीनला आंतरराष्ट्रीय पातळीवर प्रतिष्ठा व मान्यता आहे हे चिनी नागरिकांना दिसावे/पटावे म्हणूनच बीजिंग येथील ऑलिम्पिक सोहळ्यासाठी परदेशांतील जास्तीत जास्त नेत्यांनी उपस्थित राहावे, असा प्रयत्न चीनच्या नेत्यांनी केला. चिनी नागरिकांमध्ये राष्ट्रवादाची जाणीव प्रखर असून तो न जपणाऱ्या चिनी नेत्यांना समाजाकडून टीका सहन करावी लागते. तसेच, बेलग्रेड येथे चिनी दूतावासात अपघाताने बॉंबस्फोट झाला तेव्हा आणि जागतिक व्यापार संघटनेमधील चर्चांच्या वेळी चिनी नेत्यांनी चीनची भूमिका ठामपणे पुढे रेटली नाही त्या वेळी चिनी नेतृत्वावर दुबळे आणि हिंमत नसलेले अशी टीका करण्यात आली होती. ही याची दोन उदाहरणे. तिबेट प्रश्नासंदर्भात तिबेटी नागरिकांनी निदर्शने केली तेव्हाही चिनी नेतृत्वाला टीकेला सामोरे जावे लागले होते. नागरिकांच्या अशा टीकेला चीनमध्ये महत्त्व दिले जाते. त्यामुळे चीनमध्ये साम्यवादी राजवट असली आणि तेथील नेते जनतेने निवडून दिलेले नसले; तरी, नागरिकांच्या मतांची दखल (कदाचित त्यांच्या सोयीनुसार) चीनमधील नेते घेतात. चीनमध्ये लोकशाही नसली तरी तेथे जनमताचा विचार केला जातो. मग, चीनने लोकशाहीच्या मार्गाने जाण्याचे ठरविले तर चीनचे परराष्ट्रधोरण कसे असेल, याची उत्कंठा अनेकांना आहे. जनमताचा विचार करता, चीनमधील परराष्ट्रधोरणात चीन-जपान संबंध आणि तिबेट प्रश्न हे दोन विषय मोठे व महत्त्वाचे ठरतात.

## चीन-जपान संबंध

चीन व जपान यांच्यात १८९४-९५मध्ये पहिले व १९३७-४५ या काळात दुसरे युद्ध झाले. कोरियावर कोणाचे वर्चस्व असावे या एका कारणावरून झालेले हे युद्ध म्हणजे आशियातील राजकारणात महत्त्वाची ठरलेली एक घटना गणली जाते. या युद्धात चीनला माघार घ्यावी लागली होती. मग, चीनने शांततेसाठी तह केला. यानंतर १९३१ पासून चीन व जपान यांच्यात कुठे ना कुठे खुटखुटत होतेच. १९३७ पासून चीन-जपान संबंध ताणले जाऊन त्यांच्यात पुन्हा युद्ध झाले. तेव्हा चीनने जर्मनी व अन्य देशांची मदत मागितली होती. दरम्यान, जपानने पर्ल हार्बरवर हल्ला केल्यानंतर दुस-या महायुद्धाला तोंड फुटले आणि त्याची परिणती जपानवर अणुबाँब टाकून युद्ध संपण्यात झाली. जपानने संपूर्ण शरणागती मान्य केली. या काळात चीन-जपान संबंध ताणले गेले ते आजपर्यंत. शीतयुद्धा-दरम्यान दोन्ही देशांनी कुरापती न काढता काही प्रमाणात राजकीय व व्यापारी संबंध प्रस्थापित केले. आता, इंटरनेटमुळे जग जवळ आल्याने उभयपक्षी समाजांत काही प्रमाणात सांस्कृतिक देवघेवही होत आहे. राजकीय, व्यापारविषयक आणि सामाजिक-सांस्कृतिक संबंध प्रस्थापित होत असताना या दोन्ही समाजांमध्ये राष्ट्रवाद प्रखर आहे, हेही लक्षात घेणे गरजेचे आहे. त्यामुळे, एकीकडे सौहार्दाची भूमिका पुढे येत असली तरी दुसरीकडे राष्ट्रवाद चेतविला गेला तर दोन्ही राष्ट्रे युद्धाच्या दिशेने जाण्याची शक्यता नाकारता येत नाही, असे काही विश्लेषकांचे निरीक्षण सांगते.

अलीकडे, चालू शतकात पुन्हा एकदा चीनमध्ये राष्ट्रवादाची भावना उफाळून वर आलेली दिसते. त्याचे कारण चिनी नेतृत्वाच्या कृतीतच दडले आहे. साम्यवादी विचारसरणी काही प्रमाणात पिछाडीवर पडल्याने आणि सांस्कृतिक क्रांतीनंतर नागरिकांचा भ्रमनिरास झाल्याने यातून चिनी नागरिकांचे मन दुसरीकडे वळावे व त्यांना सकारात्मक कृती करण्याची प्रेरणा मिळावी यासाठी १९८०च्या दशकात चिनी नेतृत्वाने चीनचा इतिहास नागरिकांपुढे आणला. इतिहासापासून धडा शिकून सामर्थ्यशाली चीन घडावा, असे याद्वारे अपेक्षित होते. म्हणून शालेय/महाविद्यालयीन अभ्यासक्रमांतही या इतिहासाचा समावेश करण्यात आला.



दरम्यान, हा इतिहास पुढे आणताना युद्धाच्या वेळेस चिनी नागरिकांवर जपानकडून झालेला अत्याचारही हळूहळू नागरिकांसमोर येऊ लागला. परिणामी, साम्यवादी सरकारच्या अपेक्षेनुसार चिनी समाजमनाची वाटचाल ‘सामर्थ्यशाली चीन’ बनविण्याकडे होऊ लागली, पण त्याच वेळी जपानविरोधी मनेही घडत गेली. समाजमनाला मिळालेले हे अनपेक्षित वळण बदलणे सरकारला शक्य झाले नाही. त्यामुळे आजही परराष्ट्रधोरणाचा विचार होतो तेव्हा तेथे जपानविरोध दिसून येतो. म्हणून चीनमधील मुत्सद्यांनी असे सुचविले की, झाले गेले विसरायचे व चीनच्या अलीकडच्या व्यूहात्मक धोरणांनुसार जपानबरोबर संबंध वाढवायचे. धोरणकर्त्यांना ही सूचना मान्य झाली. पण, याबाबत नागरिकांची भूमिका नकारात्मक असल्याने सरकारला पुढे पावले टाकता आली नाहीत. आता, जपानबरोबर राजकीय व व्यापारी संबंध चांगले ठेवणे हे चीनच्या हिताचे आहे, अशी सरकारची भूमिका असल्याचे नागरिकांपर्यंत पोहचविले जात आहे.

## चीन व तैवान

तैवानचे राजकीय स्थान हा चीनसाठी एक महत्त्वाचा प्रश्न बनून राहिला आहे. तैवानच्या नागरिकांना जसा तैवान ‘आपला’ वाटतो, तसाच चिनी नागरिकांनाही तो ‘आपला’ वाटतो. तैवान व चीन यांच्यात भौगोलिक अंतर असले तरी तैवान हा स्वतंत्र देश नाही अशीच कोट्यवधी चिनी नागरिकांची भूमिका आहे. अशी भूमिका बनण्याचे कारण म्हणजे तो चीनचाच अविभाज्य भाग आहे, असे चिनी नागरिकांचे मत आहे. इसवीसन १६०० नंतर तेथे चीनमधील हानवंशियांनी स्थलांतर केले. त्यामुळे तेथील सुमारे ८५ टक्के नागरिक हानवंशीय आहेत. त्यामुळे तैवान व चीन यांची संस्कृती एकच आहे. चीन-जपानमधील पहिल्या युद्धाच्या वेळी जपानने तैवानवर वर्चस्व प्रस्थापित केले. सुमारे पन्नास वर्षे तैवान हा जपानच्या वर्चस्वाखाली होता. पण, दुसरे महायुद्ध संपतेवेळी जपानने माघार घेतली तेव्हा जपानने आपल्या वर्चस्वाखालील हा प्रदेश चीनला परत दिला. मात्र, तैवानने आपली स्वतःची लोकशाही राज्यव्यवस्था राबविली आहे. तैवान प्रश्नाबाबत २००८-०९ या दरम्यान केलेल्या एका सर्वेक्षणाद्वारे तैवानी

*(पृष्ठ ३५ वर पाहावे)*

राजकीय

# 'कॅन वी चेंज ?'

जगाची महासत्ता असलेल्या अमेरिकेची धोरणे ही जागतिक राजकारणाच्या दृष्टीने महत्त्वाची आणि अभ्यासकांसाठी चर्चेची ठरतात. त्यातही, अमेरिकेच्या मदतीवर अवलंबून असलेल्या राष्ट्रांच्या लेखी त्यांचे महत्त्व अधिक असणे स्वाभाविक ठरते. आंतरराष्ट्रीय राजकारणात आणि अमेरिकेच्या परराष्ट्रधोरणात इराकशिवाय इराण, कोरिया, अफगाणिस्तान, पाकिस्तान, रशिया आणि चीन या देशांनी अधिक जागा मिळविली आहे. तर, लॅटिन अमेरिका व कॅरेबियन देशांना मात्र अमेरिकेच्या धोरणात योग्य स्थान मिळालेले दिसत नाही, असे मत अलीकडे अमेरिकेतील अभ्यासकांनी मांडले आहे. या देशांतील सुरक्षा आणि संरक्षण या विषयांचा विचार अमेरिकेने गांभीर्याने केलेला दिसत नाही, असे त्यांचे प्रतिपादन आहे.

अमेरिकेच्या दृष्टीने (मध्य आशियाच्या तुलनेत) लॅटिन अमेरिका व कॅरेबियन देश हे तसे 'शांत प्रदेशा' त मोडतात. अमेरिकेला लॅटिन अमेरिका व कॅरेबियन देशांकडून कोणत्याही प्रकारचा धोका नाही. लॅटिन अमेरिकेतील व्हेनेझुएला, कोलंबिया, चिली, ब्राझील असे काही देश अलीकडच्या काळात शस्त्रास्त्रांच्या खरेदीत रस दाखवीत असल्याने शस्त्रास्त्रांची स्पर्धा वाढते आहे किंवा कसे, असा संशय निर्माण होत आहे. पण हे सर्व देश आपापसांत मोठी भांडणे करीत नसल्याने सध्या तरी सर्व काही आलबेल आहे, असे दिसते. तसेच, या देशांकडून संरक्षणविषयक बाबींवर केल्या जाणा-या वित्तीय तरतुदींचे/खर्चाचे त्यांच्या ठोकळ देशी उत्पादनाशी जे प्रमाण आहे त्या प्रमाणात लक्षणीय वाढ झाल्याचे आढळत नाही. अर्थात, याचा अर्थ, लॅटिन अमेरिकेत वा कॅरेबियन देशांत प्रश्नच नाहीत, असा नाही. उलट, संयुक्त राष्ट्रसंघाच्या एका अभ्यासानुसार लॅटिन अमेरिकेतील हिंसात्मक घटनांमध्ये वाढ झालेली दिसते. या घटनांमुळे निर्माण झालेली सुरक्षाविषयक आव्हाने ही दहशतवादासारख्या प्रश्नांपेक्षा वेगळी आहेत.



ही आव्हाने प्रशासन, नागरिकांची सुरक्षा, आर्थिक विषमता, शहरीकरण, काही अ-राजकीय घटक आणि जागतिकीकरणाचे अटळ परिणाम यांच्यामुळे निर्माण झालेली आहेत. ढासळलेल्या राज्यव्यवस्थेमुळे सार्वभौमता धोक्यात येण्याच्या दिशेने देशाची वाटचाल होऊ लागते. त्यातच, गरिबी, विषमता आणि विविध पातळ्यांवरील अकार्यक्षम प्रशासन या प्रश्नांची भर पडते. अशा वेळी, अनेक प्रकारच्या गुन्हेगारीच्या घटना घडून सार्वजनिक सुरक्षेसमोर आव्हान निर्माण होते. लॅटिन अमेरिकेतील देशांमधील ही परिस्थिती अमेरिकेने विचारात घेतली पाहिजे, असे अमेरिकी अभ्यासकांना वाटते. कारण, जगाच्या व अमेरिकेच्या सुरक्षिततेचा विचार करून लोकशाहीव्यवस्थांना समर्थन देण्याचे अमेरिकेचे आजवरचे धोरण राहिले आहे. मोठ्या अर्थव्यवस्था आणि भू-राजकीयदृष्ट्या संवेदनशील असलेले देश, अण्वस्त्रांच्या स्पर्धेत सहभागी होऊ शकणारे देश किंवा ज्या देशांमधील नागरिक अमेरिकेत निर्वासित म्हणून येऊ शकतात असे देश, अशांच्या बाबतीत अमेरिकेने आजवर खूपच सक्रिय हालचाली केल्या. मात्र, त्यामुळे त्या देशांत यथावकाश तयार झालेली अस्थिरता बघता लॅटिन अमेरिका आणि कॅरेबियन देशांबाबत नव्याने काही विचार केला पाहिजे, असे अभ्यासकांना वाटते.

त्या दृष्टीने अमेरिकेची आजवरची परंपरागत धोरणे अपुरी ठरत असल्याचे मत अभ्यासक मांडतात. येथे आणखी एक बाब लक्षात घेतली पाहिजे. ती म्हणजे, या उपखंडातील नेते अमेरिकेच्या आजपर्यंतच्या 'बिग ब्रदर' वा 'आम्ही तुमचे पालक' या भूमिकेला कंटाळले आहेत. तसेच, लॅटिन अमेरिकेतील देश पूर्वी अमेरिकेवर ज्या प्रमाणात अवलंबून होते तेवढे आता ते अवलंबून नाहीत. अभ्यासकांच्या मते, लॅटिन अमेरिकेतील एकंदरीत परिस्थिती संदर्भात खालील चार मुद्द्यांचा विशेष विचार करण्यात आल्यास ते उचित ठरेल.

(१) लोकशाहीतील प्रशासनात्मक घटकांचा अपुरा विकास - १९७०च्या दशकापासून लॅटिन अमेरिकेतील देशांत लोकशाही रुजू लागली असली तरी प्रातिनिधिक लोकशाहीसमोर तेथे आव्हाने उभी ठाकली आहेत. पायाभूत सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्यात तेथील केंद्रसरकारे

अक्षम ठरली आहेत. तेथील सुमारे ३८ टक्के नागरिक गरीब गटात मोडतात तर आर्थिक विषमता तीव्र बनल्याने सुरक्षाविषयक प्रश्न गंभीर होत चालले आहेत. गुन्हेगारी व हिंसाचार यांत वाढ होत असल्याने ही परिस्थिती काळजी करावी, अशी असल्याचे आढळते.

(२) आंतरराष्ट्रीय सुरक्षेला धोका - केंद्र सरकारचा दुबळेपणा व अकार्यक्षमता यांमुळे गुन्हेगारांवर व समाजकंटकांवर वचक राहत नाही. कायद्याचा, न्यायाचा अंमल आणि दरारा नसेल तर सामाजिक अस्थैर्य वाढते. इतर देश त्याचा फायदा करून घेऊ शकतात. अशा परिस्थितीत अंमली पदार्थांचा व्यापार, शस्त्रास्त्रांचा चोरटा व्यापार, हिंसाचार, काळा पैसा अशा अनेक बाबींमुळे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवरील सुरक्षा धोक्यात येते. लॅटिन अमेरिका आणि कॅरेबियन देशांत हत्या होण्याचे प्रमाण दर एक लाख नागरिकांमागे २८ इतके आहे. आफ्रिकेत हे प्रमाण दर एक लाख नागरिकांमागे आठ इतके, तर दक्षिण आशियात ते दर एक लाख नागरिकांमागे चार इतके आहे. हिंसाचाराच्या इतरही घटना तेथे घडतात. या संदर्भात २००८ मध्ये केलेल्या एका सर्वेक्षणावरून असे दिसून आले की बेरोजगारीपेक्षाही मोठा प्रश्न तेथे हिंसाचाराचा आहे, असे बहुतांश नागरिकांना वाटते. तर, 'इंटर-अमेरिकन डेव्हलपमेंट बँके'च्या एका अभ्यासानुसार प्रादेशिक अर्थव्यवस्थेला याचा फटका बसतो. हा खर्च ठोकळ देशी/प्रादेशिक उत्पादनाच्या साधारणतः १५ टक्के एवढा असतो.

(३) देशादेशांमधील सहकार्याची उणीव - लॅटिन अमेरिकेतील विविध देशांमधील समाजगटांमध्ये परस्परविश्वासाचे वातावरण नाही. सर्व देश आपली सार्वभौमता टिकविण्यासाठी प्रयत्न करीत असले तरी इतर देशांबरोबर त्यांचे धोरण सामंजस्यपूर्ण व सहकार्याचे नसते. त्यांच्यात वर्चस्व गाजविण्याची प्रवृत्ती दिसून येते. शिवाय, प्रत्येक देशाचा प्राधान्यक्रम वेगळा असतो. उदाहरणार्थ, राष्ट्राची सुरक्षा हा मुद्दा उपस्थित झाला की विकासाच्या मार्गावर असलेला चिली हा देश ऊर्जा विषयाला अग्रक्रम देतो. तर, अन्य काही देशांसाठी संघटित गुन्हेगारी हा विषय महत्त्वाचा असतो. त्यामुळे सामायिक मूल्यांबाबत तेथे चर्चा होणे गरजेचे आहे, असे मत सुरक्षाविषयक एका विशेष चर्चासत्रात मांडण्यात आले होते.



(४) अमेरिकेवरील अवलंबन घटणे - गेल्या १५ वर्षांपासून अमेरिकेचे सहकार्य वा मदत घेण्यासाठी लॅटिन अमेरिकेतील देश फारसे उत्सुक नसल्याचे चित्र आहे. विविध बाबींशी संबंधित आर्थिक वा राजकीय मदतीसाठी इतर देशांबरोबर व्यवहार करण्याचे धोरण काही राष्ट्रे अवलंबित आहेत. त्यामुळे लॅटिन अमेरिकेवर असलेले अमेरिकेचे वर्चस्व संपुष्टात आल्याचे मत अमेरिकेच्या परराष्ट्रविभागाच्या एका मंडळाने मांडले आहे.

**सुरक्षाविषयक धोरणाची फेररचना**

या सर्व परिस्थितीचा अभ्यास करून अमेरिकेने लॅटिन अमेरिकेतील देशांबरोबरच्या आपल्या धोरणाची फेररचना करावी, असे म्हटले जात आहे. व्यापारातील स्पर्धा वाढल्याने गेल्या दशकात प्रथमच असे घडले आहे की जागतिक व्यापारावर अमेरिकेचेच वर्चस्व असल्याचे चित्र नाही. अमेरिकेवर अवलंबून राहण्यापेक्षा प्रादेशिक पातळीवर सहकार्य वाढविण्याचा प्रयत्न विविध देशांकडून होऊ लागला आहे. अमेरिका ही जागतिक महासत्ता आहे, हे वास्तव सर्व देश जाणून आहेत. मात्र, अमेरिकेला दूर ठेवून इतर देशांबरोबरचे संबंध सुधारण्यास व वाढविण्यास अलीकडे प्राधान्य देण्याचा कल दिसून येत आहे.

आणखी एक मुद्दा असा की विविध राष्ट्रे स्वतः सक्षम व सामर्थ्यशील बनण्याचा प्रयत्न करीत असली तरी वाढती गुन्हेगारी, सुरक्षा आणि स्थैर्य या बाबी कोणत्याही देशाला एकेकट्याने हाताळणे कठीण होत चालले आहे. तंत्रज्ञानाचा वाढता प्रसार, इंटरनेट व इतर साधने यांचा वापर उपद्रवकारक घटकांकडून वाढू लागला आहे. त्यामुळे या सर्व बाबींवर नियंत्रण ठेवणे ही आता एका विशिष्ट देशाच्या अखत्यारितील बाब राहिलेली नाही. त्यामुळेही प्रादेशिक सहकार्य महत्त्वाचे ठरू लागले आहे. या परिस्थितीत अमेरिकेला व्यूहात्मक धोरण ठरवावे लागेल. एक वा दोन विषयांवर वा देशांवर लक्ष केंद्रित करून धोरण ठरविण्याचा पायंडा अमेरिकेला सोडावा लागेल. थोडक्यात, अमेरिकेला इतर देशांचा विश्वास पुन्हा एकदा मिळवावा लागेल, अशी विचारधारा परराष्ट्रधोरणविषयक अमेरिकी तज्ज्ञांत आताशा बळकट बनत आहे.

*(पृष्ठ ३६ वर पाहावे)*

**तंत्रज्ञान**

# ‘जोडलेल्या’ जगात....

इंटरनेट या तंत्रज्ञानाच्या जाळ्याने जोडले गेलेले जग आज एका वेगळ्या टप्प्यावर पोहचले आहे. या टप्प्यावर ‘गीक्स’ (geeks) असा एक नवीनच गट उदयास आला आहे. भविष्यात या ‘गीक्स’ची संख्या वाढण्याचीच शक्यता अधिक आहे. हे ‘गीक्स’ म्हणजे मानवाची नवी प्रजाती नव्हे. तर, ती तुमच्या-आमच्यासारखी माणसेच, पण संगणकाशी संबंधित नवनवीन प्रकारचे तंत्रज्ञान, प्रणाली आणि नवमाध्यमांशी अधिकाधिक मैत्री करणारी, त्यांचा वेगवेगळ्या प्रकारे उपयोग करून त्यांद्वारे विविध प्रकारची माहिती मिळविणारी, त्या माहितीचा उपयोग विविध कारणांसाठी करणारी. एक प्रकारे तंत्रज्ञानाने झपाटलेली जरा जगावेगळी म्हणता येतील अशी माणसे. ‘गीक्स’ या शब्दाचा उपयोग निराळ्या प्रकारे केला जातानाही दिसतो. एखाद्या विशिष्ट विषयाचा/विशिष्ट विषयातील विशिष्ट उपविषयाचा विचार चौकटीच्या बाहेर पडून (म्हणजे पठडीबद्ध पद्धतीने न करता) आणि नवतंत्रज्ञानाच्या मदतीने करणारेदेखील ‘गीक्स’च असू शकतात. उदाहरणार्थ - गणितातील ‘गीक्स’, भौतिकशास्त्रातील ‘गीक्स’ आणि लहान-थोरांच्या मनोरंजनात मोठी भूमिका निभावणा-या कॉमिक्ससंबंधित ‘गीक्स’च असतात.

या ‘गीक्स’चा आणि आपला थेट संबंध काय, असा प्रश्न आपल्या मनात नक्कीच आला असेल. हे ‘गीक्स’ तुमच्या-माझ्या जीवनात प्रवेशले आहेत, ते आपल्या वर्तनाचा बारकाईने अभ्यास करीत आहेत, हे या प्रश्नाचे उत्तर आहे. मोठमोठ्या कंपन्या त्यांचा उपयोग करून घेत आहेत. ‘इंटेल ग्रुप’ ही संगणकाच्या क्षेत्रातील एक अग्रगण्य कंपनी. या कंपनीचे सेन्सर्स एका शहरातील अनेक ज्येष्ठ नागरिकांनी आपल्या घरी बसवून घेतले. कारण, या उपकरणामुळे घरातील त्यांची सर्व प्रकारची हालचाल - अगदी दात घासण्यापासून ते झोपेत ते उठतात का इथपर्यंत - नोंदली जाणार होती. ते कोणत्या पट्टीत बोलतात, फोनवर मित्रांचा, आप्तांचा आवाज



ओळखण्यास त्यांना किती वेळ लागतो, त्यांच्या खाण्याच्या वेळा व पद्धती कशा आहेत अशी अनेक प्रकारची माहिती नोंदली जाणार होती. तसेच इंटरनेटमार्फत ती इंटेलच्या कार्यालयात पोहचू शकणार होती. म्हणजे, इंटेलमधील संशोधकांना ज्येष्ठ नागरिकांच्या आरोग्याशी संबंधित विविध प्रकारची माहिती अभ्यासासाठी उपलब्ध होऊ शकणार होती. संशोधकांच्या भाषेत या महितीला ‘बिहेवियर बेसलाइन्स’ (आरोग्यवर्तनासंदर्भातील पायाभूत नोंदी) असे म्हणतात. अर्थात, हे संशोधन सुरुवातीच्या टप्प्यात आहे. पण ज्येष्ठ नागरिकांच्या वर्तनात होत असलेला बदल टिपून घेता आला तर विविध आजारांच्या सुरुवातीच्या काळात नेमके काय घडते ते समजून घेता येईल व आजाराबाबतची पुढील उपाययोजना आखता येईल. विशेषतः, पार्किन्सस आणि अल्झायमर्स या आजारांच्या संदर्भात असे संशोधन असे अधिक उपयुक्त ठरेल.

अशा प्रकारे संशोधन पुढे जात असतानाच वैद्यकीय व विविध क्षेत्रांत कार्य करणा-यांचा नवीन उपगट तयार होईल. वैद्यकीय क्षेत्राचा विचार करता हा गट डॉक्टर व परिचारिका यांच्यापेक्षा वेगळे कार्य करणारा असेल. आरोग्यक्षेत्रात व अन्य क्षेत्रांत वेगाने उपलब्ध होत असलेल्या माहितीच्या साठ्यातून योग्य ती माहिती बाजूला करून, त्याचे विश्लेषण करण्यात या गटातील व्यक्ती तज्ज्ञ असतील. या विषयाचा अभ्यास करणारे स्टीव्ह बेकर यांनी त्यांना the numerati असे संबोधले आहे. यांत गणितज्ज्ञ, अभियंते, संगणक अभियंते अशा अनेकांचा समावेश होऊ शकतो/होतो. हे numerati विविध प्रकारची माहिती मिळवितात. म्हणजे कोण कोणत्या वेबसाइटला भेट देत आहेत, इंटरनेटच्या माध्यमातून कोणकोणत्या प्रकारची खरेदी कोण करीत आहेत, कोणत्या नवीन तंत्रज्ञानाची, नवीन मोबाइल फोनची माहिती मिळवित आहे, मोबाइल फोनचा वापर कोण कसा करीत आहे इत्यादी असंख्य प्रकारची ग्राहकांची वित्तंबातमी numerati संगणकामार्फत एकत्र करतात. असे करताना त्या त्या विशिष्ट वेबसाइटला भेट देणा-या ग्राहकासाठी एक computer code निश्चित करण्यात येतो. त्याला cookie असे म्हणतात. व्यक्तीचे नाव, गाव, पत्ता इत्यादी बाबी या अभ्यासात तेवढ्या महत्त्वाच्या नसतात. एखाद्या व्यक्तीला आपले काम

वैयक्तिक स्वरूपाचे ठेवायचे असेल तर computer code (cookie) मान्य न करण्याची सोयदेखील या संदर्भात आहे. म्हणजे, व्यक्ती संगणकावर काम करीत असताना एक चौकट/विंडो संगणकाच्या पडद्यावर येते. त्यात disable cookie/enable cookie असा पर्याय असतो. हवे तिथे 'क्लिक' करणे हे तुमच्या हाती असते.

अशा प्रकारे मिळविलेल्या माहितीचा अभ्यास numerati करतात. त्यामुळे मानवी वर्तनविषयक माहितीची एक नवीन प्रयोगशाळाच जणू याद्वारे आकाराला येते आहे असे दिसते. कारण, कोणत्या जाहिराती बघितल्या, वाचल्या जात आहेत, कोणत्या प्रकारच्या माहितीसाठी कोण प्रयत्नशील आहे यावरून, ती व्यक्ती कोणकोणत्या उत्पादनाची ग्राहक असू शकते याविषयी आराखडे बांधण्यात येऊ लागले आहेत. अशा भावी ग्राहकांपर्यंत पोहचून त्यांना आपल्या उत्पादनाकडे/सेवेकडे आकर्षित करण्याचे काम विविध कंपन्यांमधील मंडळी करीत आहेत. अर्थात, अशा प्रकारच्या माहितीवरून फक्त अंदाज बांधता येतो, काही शक्यता वर्तविता येतात, पण व्यक्ती नेमक्या कशा प्रकारे वर्तन करेल हे काही ठामपणे सांगता येत नाही, ही बाबही येथे लक्षात घेणे गरजेचे ठरते. त्यामुळे, या सुरुवातीच्या टप्प्यात जेथे अल्पस्वल्प चुका झालेल्या चालतील अशा ठिकाणी numeratiमार्फत हे प्रयोग करून बघण्यात येत आहे. विशेषतः, जाहिरात व विपणनाच्या क्षेत्रात याचा बराच उपयोग करण्याचा प्रयत्न होतो आहे. अशा प्रकारच्या अभ्यासाबाबत अनेक जण नापसंती व्यक्त करतात. आपल्या खाजगी आयुष्यावर आक्रमण होते आहे असे त्यांना वाटते. तसे पाहता numerati व ती व्यक्ती या संदर्भात ही तक्रार नसते. पण एका यंत्रामार्फत हे सर्व घडून येत आहे, हे अनेकदा पचनी पडणे कठीण होते. तरीही भविष्यकाळात डिजिटल माहितीचा साठा मोठ्या प्रमाणात वाढणार आहे, असा तज्ज्ञांचा अंदाज आहे.

माहिती मिळविण्याचा आणखी एक प्रकार म्हणजे मोबाइल फोन होय. मोबाइल फोन जवळ बाळगून माणसे फिरतात तेव्हा विशिष्ट संगणकप्रणालीचा उपयोग करून संगणकात विशिष्ट ठिपक्यांच्यामार्फत त्यांच्या फिरण्याचा मार्ग दर्शविला जातो. यावरून ती व्यक्ती कुठेकुठे



हिंडली ते समजून घेता येते. एखाद्या व्यक्तीच्या ठिपक्यांच्या मार्गात सातत्याने खंड पडत असेल तर ती व्यक्ती प्रवास करीत असेल, असा काही अंदाज मांडता येईल का, तसेच काही विशिष्ट वर्तनाचा आकृतिबंध (पॅटर्न) तयार होऊ शकेल का, असे काही प्रश्न संशोधकांना पडले आहेत. विशिष्ट वर्तनाच्या आकृतिबंधाला विशिष्ट रंग देता येईल आणि तो एक विशिष्ट गट म्हणून ओळखला जाईल. मोबाइल फोनचे जाळे जितके विस्तारेल आणि मोबाइल फोनच्या संचात जसजशा सुधारणा होत जातील आणि वापर वाढत जाईल तसतशी प्रत्येक व्यक्तीची अधिकाधिक माहिती numeratiला उपलब्ध होईल.

जागतिक अर्थव्यवस्था बिकट कालखंडातून वाटचाल करत असण्याच्या सध्याच्या काळात numeratiचे महत्त्व अधिकच वाढण्याची शक्यता दिसते. कारण, मानवी वर्तनविषयक माहिती मिळवून आपले उत्पादन/सेवा ग्राहकांपर्यंत पोहचविण्याची निकड/गरज अनेक कंपन्यांना वाटेल. कार्यालयांतर्गतही कर्मचा-यांचे वर्तन समजून घेण्यासाठी याचा उपयोग होऊ शकतो. कंपनीच्या कामकाजासंदर्भात 'सोशल नेटवर्किंग' करणारे - म्हणजे नवनवीन कल्पना सुचविणे, त्या इतरांपर्यंत पोहचविणे, त्यावर चर्चा घडवून आणणे - असे वर्तन करणारे कर्मचारी - आणि 'सोशल नेटवर्किंग' न करणारे कर्मचारी, अशी ढोबळ विभागणी कंपन्यांना करता येणे शक्य होईल. अर्थात, कोणत्याही बाबतीत सर्व प्रकारचे निर्णय केवळ numeratiच्या माहितीवर/ विश्लेषणावर अवलंबून राहतील, असा याचा अर्थ नाही. मात्र, ग्राहकांबाबत अशी पूरक माहिती मिळविण्याचा प्रयत्न सतत होत राहील याची शक्यता दिसते. अशी सर्व माहिती मिळविताना व त्यावर प्रक्रिया करताना numeratiसमोर विविध आव्हाने उभी ठाकू शकतात. त्यांचे सर्व अंदाज सदासर्वकाळ योग्य ठरतीलच असे नाही, हेही लक्षात घेतले पाहिजे. आपल्याबद्दल विविध प्रकारची माहिती इतरांना उपलब्ध व्हावी असे किती जणांना वाटेल, हा प्रश्नही महत्त्वाचा आहेच. पण ज्येष्ठ नागरिकांच्या व वृद्धांच्या संदर्भात याचा अधिक उपयोग होईल, असे दिसते. एकंदरीत माणसांचे आयुष्य नवतंत्रज्ञानाला खरोखरच 'जोडले' जात असल्याचे चित्र वेगाने पुढे येते आहे ! ■■

सामाजिक

# विवंचना ‘दुस-या बाळपणा’ची !

‘म्हातारपण म्हणजे जणू दुसरे बालपण’च, असे आपण मोठ्या कौतुकाने म्हणतो खरे पण, लहान बाळाचे घरादारात जेवढे कोडकौतुक होते त्याच्या काही टक्के तरी लाडकोड घरातल्या पिकल्या पानांच्या वाट्याला येते का ? अगदी खरे सांगा. आपल्या रोजच्या जगण्यातूनच म्हणी आणि वाक्प्रचार जन्माला येतात. पण गंमत अशी दिसते की, आपले जगणे त्या म्हणींबरहुकूम सदासर्वकाळ असतेच वा असेलच असे सांगता येत नाही. हा विरोधाभास आहे पण तो अनुभवास येतो खरा. आणि हा अनुभवही पुन्हा कसा, तर, चार भिंतींमधील कुटुंबांपासून ते थेट वृद्धाश्रमापर्यंत सार्वत्रिक. तेही साहजिकच म्हणावयास हवे. अखेर जे पिंडी ते ब्रह्मांडी ! आजची परिस्थिती खरोखरच अशी आहे की, वयोवृद्धांच्या वाढत्या संख्येपायी उभे ब्रह्मांडच सध्या विवंचनेत आहे. ही विवंचना आहे ती या ‘दुस-या बाळपणा’ची उस्तवार कशी करावयाची, याची. जगाच्या विविध भागांत ही चिंता आज कमीअधिक प्रमाणात दाटते आहे, कारण, पिकलेले केस आणि त्यांची निगराणी राखणारी हिरवी मने व तरुण हात यांचे प्रमाण दिवसेंदिवस व्यस्त बनत चालले आहे.

उभ्या जगाची लोकसंख्या आजमितीस, गेला बाजार, किमान ७०० कोटींच्या आसपास आहे. या लोकसंख्येची वयानुसारी जडणघडण बघितली तर चित्र असे दिसते की, वयाची साठी उलटून गेलेल्यांचे एकूणांत प्रमाण आहे जवळपास ११ टक्के. हे प्रमाण काही फार नाही, असेच कोणीही म्हणेल. परंतु, आणखी केवळ चारच दशकांनी जगाची लोकसंख्या जेव्हा साधारणपणे ९०० कोटींच्या घरात जाईल त्या वेळी हेच प्रमाण चक्क दुपटीने वाढून २२ टक्क्यांवर पोहोचलेले असेल, असे अंदाज लोकसंख्याशास्त्रज्ञ व्यक्त करीत आहेत. गंमत म्हणजे, श्रीमंत जगात हेच प्रमाण पोहोचले असेल ३४ टक्यांच्या घरात ! म्हणजेच, प्रत्येक तीन माणसांपैकी एकाच्या माथ्यावर चंदेरी झिलई !!



या सगळ्या स्थित्यंतराचे आपल्या सगळ्यांच्याच व्यक्तिगत आणि सामुदायिक जीवनात जाणवणारे पडसाद इतके विविधांगी असणार आहेत की त्यांची पुरेशी कल्पनाही आपल्याला अजून आलेली नाही. लोकसंख्येचे आकारमान हाच आमच्या आजवरच्या या संदर्भातील विचारविनिमयाचा केंद्रबिंदू राहिलेला आहे. आता या पुढे, लोकसंख्येच्या आकारमानइतकीच तिची जडणघडणही तितकीच संवेदनशील ठरणार आहे. कारण, सरकारचे वित्तीय व्यवस्थापन, सार्वजनिक आरोग्य, रोजगार, निवारा, कुटुंबसंस्था, उत्पादन प्रणाली, उपभोग, बचत, वैद्यकीय सेवा व संशोधन, औषधनिर्मिती... यांसारख्या अक्षरशः अनेक बाबींवर जागतिक लोकसंख्येतील या गुणात्मक बदलाचे परिणाम संभवतात. सर्वच बाबतींत शेखी मिरवणारे जगातील श्रीमंत देश तर त्यातल्या त्यात अधिकच धास्तावलेले दिसतात. कारण, एकंदर लोकसंख्येतील वयोवृद्धांच्या वाढत्या प्रमाणापायी या गटातील देशांसमोर उभे राहत असलेले आव्हान चांगले तिपदरी-चौपदरी आहे.

एक तर, एकंदर लोकसंख्येमध्ये वयोवृद्धांचे प्रमाण वाढत जाण्याने येणा-या काळात श्रीमंत देशांना श्रमशक्तीचा तुटवडा जाणवेल हे उघड आहे. कारण, गात्रे थकल्यानंतर श्रमदलातून बाहेर पडणा-यांची जागा घेण्यास तरुण व्यक्तीच समाजात नसतील तर यथावकाश एकंदर श्रमदलाचे आकारमान आकुंचन पावत जावे, हे ओघानेच येते. उत्पादनप्रक्रियेतील श्रमांचा पुरवठाच खुंटायला लागला तर त्याचा अपरिहार्य परिणाम एकंदर उत्पादनाच्या आकारमानावर तसेच उत्पादन वाढीच्या वेगावर होणारच. वैद्यकशास्त्रातील संशोधन व प्रगतीपायी म्हातारपणामुळे माणूस अगदीच निकामी न झाल्याने वय वाढले तरी तो काम करीत राहील आणि त्यामुळे श्रमशक्तीच्या पुरवठ्याबाबत अवास्तव चिंता वाहण्याचे कारण नाही, असे जरी एक वेळ समजले तरी वाढत्या वयाबरोबर व्यक्तीची उत्पादकता घटत जाणे अपरिहार्यच ठरते. म्हणजे, काहीही झाले तरी उत्पादनाच्या मात्रेवर परिणाम हा होणारच. एकूण समाजात आणि पर्यायाने श्रमदलातही वृद्धांचे प्रमाण तुलनेने अधिक असेल तर सर्वसाधारण उत्पादकतेची पातळी खालावलेलीच राहणार. याचाच दुसरा परिणाम म्हणजे निवृत्तिवेतनासह एकंदरच सामाजिक सुरक्षेपोटी सरकारी तिजोरीवरील भार वाढणार.

जागतिक स्तरावर लोकसंख्येचे हे जे रंगरूप पालटते आहे त्याच्यामागे ढोबळमानाने दोन कारणे दिसतात. एक म्हणजे, माणसाचे सरासरी आयुर्मानच एकंदरीने वाढते आहे. १९०० साली जागतिक पातळीवर व्यक्तीचे सरासरी आयुर्मान होते केवळ ३० वर्षे. अगदी प्रगत, श्रीमंत देशांतही ते जेमतेम पन्नाशीच्या आतबाहेरच होते. आजचे चित्र असे आहे की, माणसाचे सरासरी जीवनमान चांगले ६७ वर्षांपर्यंत उंचावलेले दिसते. पुढारलेल्या देशांत तर ते सरासरी ७८ वर्षे इतके आहे. वैद्यकशास्त्रातील सुधारणा व संशोधने, नवनवीन आणि प्रगत औषधोपचार आणि सर्वसाधारण आरोग्यसुविधांची उपलब्धता व गुणवत्ता यांतील विकास या सगळ्याचा हा एकत्रित परिणाम होय. दुसरे कारण जे दिसते त्याचा संबंध आहे तो कुटुंबाच्या सरासरी आकामानाशी. वेगवेगळ्या प्रकारच्या सामाजिक, सांस्कृतिक, व्यावसायिक व आर्थिक कारणांमुळे कुटुंबाचा आकार मर्यादितच ठेवण्याकडे आताशा सर्वसामान्य कुटुंबवत्सलांचा कल वाढतो आहे. याचा थेट परिणाम दिसतो तो सरासरी अपत्यसंख्येवर. १९७०च्या दशकात जागतिक पातळीवर एक महिला तिच्या जननक्षम काळात सरासरी ४.३ अपत्यांना जन्म देत असे. आज हीच अपत्यसंख्या २.६ पर्यंत घसरलेली आहे. श्रीमंत देशांतील चित्र तर अधिकच वेगळे दिसते. सरासरी अपत्य संख्या तिथे १.६ पर्यंत खाली आलेली दिसते. साधारणपणे २०५० सालापर्यंत हीच जागतिक सरासरी दोनपर्यंत घटेल, असा अंदाज या क्षेत्रातील तज्ज्ञ आज व्यक्त करीत आहेत.

या सगळ्या बदलांचा एक अपरिहार्य परिणाम समाजात निवृत्त व्यक्ती आणि कमावणा-या व्यक्ती यांचे जे परस्पर प्रमाण असते ते प्रमाण व्यस्त बनण्यात घडून येतो. १९८०च्या दशकाचा विचार केला तर जगातील श्रीमंत देशांमध्ये निवृत्तीच्या वयातील प्रत्येकी एका इसमामागे आर्थिकदृष्ट्या सक्रिय वयोगटातील सरासरी पाच व्यक्ती असत. आजमितीस हे प्रमाण १:४ असे बनले आहे. येत्या ४० वर्षांत हेच गुणोत्तर १:२ होण्याची चिन्हे दिसत आहेत. या संदर्भात जपानचे आजचेच चित्र पाहण्यासारखे आहे. आजच्या जपानमध्ये दर एका निवृत्त जपानी व्यक्तीमागे तीन व्यक्ती कमावणा-या आहेत. २०५० सालापर्यंत हे गुणोत्तर १:१.५ असे होण्याची शक्यता आहे.



**प्रश्न सार्वजनिक वित्तीय व्यवस्थापनाचा**

म्हणजे, आजमितीस एका निवृत्त व्यक्तीच्या निवृत्तिवेतनादी लाभांचा वित्तीय भार पेलण्यास निदान चार जागतिक स्तरावर सरासरीने सक्रिय आहेत. आणखी केवळ चारच दशकांनी, एका निवृत्त नागरिकाचा भार पेलण्यास केवळ दोनच नोकरदार असणार आहेत ! या सगळ्याचा ताण सरकारच्या तिजोरीवर आणि पर्यायाने सरकारच्या वित्तीय व्यवस्थापनावर येतो. आर्थिकदृष्ट्या सक्रिय आणि कमावणारे तरूण व निवृत्तिवेतनधारक यांचे समाजातील प्रमाण व्यस्त बनले की तुलनेने कमी असणा-या तरुण नोकरदारांच्या खांद्यावर वयोवृद्धांच्या वाढत्या संख्येचा भार पडतो. जिथे सरकारतर्फे वयोवृद्धांना निवृत्तिवेतन अदा केले जाते तिथे तो पैसा सरकारच्या तिजोरीतून जातो. सरकार तरी पैसा कोठून आणणार... तर, नोकरदारांकडून तिजोरीत जो कर जमा होतो त्यातूनच. हेच प्रमाण जर का व्यस्त बनू लागले तर तिजोरीवर ताण येणारच. मग प्रश्न निर्माण होतो तो सार्वजनिक वित्तीय व्यवस्थापनाचा. तिजोरीवर वाढणारा भार दुपदरी असतो. निवृत्तिवेतनावरील खर्च वयोवृद्धांच्या वाढत्या संख्येबरोबर तसेच वाढत्या सरासरी आयुर्मानाबरोबर फुगत जातो. केवळ इतकेच नाही तर, या ना त्या स्वरूपात सामाजिक सुरक्षेचे कवच पुरविण्याबरोबरच सार्वजनिक आरोग्य, विमा यांसारख्या बाबींवरही वाढीव खर्च करण्याची जबाबदारी सरकारला उचलावी लागते.

आज देशोदेशी 'पेन्शन रीफॉर्म्स'ची जी चर्चा ऐकू येते तिची पार्श्वभूमी हीच आहे. गेल्या पिढ्यांतील निवृत्तांना ज्या प्रमाणात निवृत्तिवेतनादी लाभ मिळाले तसे व तितके लाभ आगामी काळातील निवृत्तांना मिळणे दुरापास्तच दिसते. सरासरी आयुर्मानात लक्षणीय वाढ घडून आलेली असली तरी निवृत्तीच्या वयामध्ये मात्र अनेक देशांमध्ये बरेच वर्षांत काहीही बदल झालेला दिसत नाही. परिणामी, निवृत्तिनंतरचे लाभ आजचे निवृत्त पूर्वीच्या तुलनेत बरीच वर्षे उपभोगतात. या लाभांचे प्रमाणही घसघशीत असल्याने निवृत्तीच्या अधिकृत वयापूर्वीच स्वेच्छानिवृत्ती घेणा-यांचे प्रमाण पुढारलेल्या विकसित देशांमध्ये अगदी आतापर्यंत लक्षणीय असे. कागदोपत्री निवृत्तीचे वय ६५ वर्षे असूनही ऑस्ट्रेलियात प्रत्यक्षातील वय ५९ आहे.

परंतु, आता मात्र ही परिस्थिती झपाट्याने बदलत असल्याचा अनुभव येतो. एकीकडे श्रमदलाचे आकारमान आकुंचित बनते आहे तर दुसरीकडे निवृत्त व्यक्तींच्या निवृत्तिनंतरच्या आयुष्याचा कालावधी सरासरीने वाढतो आहे. त्यामुळे, सरकारतर्फे चालविल्या जाणा-या निवृत्तिवेतनादी योजना वित्तीयदृष्ट्या दिवसेंदिवस डोईजड होत आहेत. श्रीमंत देशांमधील आजचेच चित्र असे आहे की, निवृत्तिवेतनापोटी या देशांचे सरासरीने आठ टक्के ठोकळ देशी उत्पादन खर्ची पडते. जर्मनी. इटली, फ्रान्स यांसारख्या देशांमध्ये तर हे प्रमाण या सरासरीहूनही अधिकच भरते. कोणत्याही प्रकारचे 'पेन्शन रीफॉर्म्स' राबविलेच गेले नाहीत तर या प्रमाणात २०५० सालापर्यंत जवळपास दुपटीने वाढ घडून येईल, असा या श्रेत्रातील अभ्यासकांचा कयास आहे. जपानसह काही पश्चिम युरोपीय देशांमध्ये तर हे प्रमाण २० टक्क्यांपर्यंत वाढण्याचीही शक्यता नाकारता येत नाही. हे सारे लक्षात घेऊ न अनेक देशांनी आता निवृत्तिवेतनाच्या सरकारी योजनांऐवजी सहभागात्मक तत्त्वावर चालविल्या जाणा-या खासगी निवृत्तिवेतन योजनांचा अंगीकार करण्याबाबत नोकरदारांना प्रोत्साहन देण्याचे धोरण अवलंबलेले दिसते.

याच्या जोडीनेच अन्य पर्याय शोधण्याचेही प्रयत्न देशोदेशी जारीने होत आहेत. सेवानिवृत्तीचे वय वाढविण्याबरोबरच, निवृत्तिवेतनादी लाभांना पात्र ठरण्यासाठी अनिवार्य असणा-या सेवाकाळात इटलीमध्ये वाढ घडवून आणण्यात आलेली आहे. तर, ब्रिटनमध्ये निवृत्तिवेतनाच्या जडणघडणीतच बदल सुचविले जात आहेत. वृद्धापकाळी ददात भासू नये या दृष्टीने निवृत्तीनंतरच्या किमान गरजा ध्यानात घेऊ न त्या गरजा भागविण्याइतपत काही किमान निवृत्तिवेतनाची तरतूद सरकारमार्फत करण्यात येते. त्यापुढे, निवृत्तिवेतनाचा पुढचा हिस्सा हा कर्मचारी आणि तो जिथे काम करतो ती कंपनी यांच्या संयुक्त सहभागाद्वारे तयार होतो. तर, तिसरा हिस्सा हा प्रत्येक कर्मचा-याने बचतीच्या विविध पर्यायांचा अवलंब करू न आपला आपण संचयित करावयाचा असतो. निवृत्तिवेतनाच्या या दुस-या व तिस-या हिश्श्यात गुंतवणूक करण्यास नोकरदारांना प्रोत्साहन देण्यासाठी अशा रकमांवर सरकारमार्फत करसवलतीही बहाल करण्यात येतात.



दुसरीकडे, जोडप्यांनी अधिक मुले जन्माला घालावीत यासाठी जपानसह अन्य अनेक देश आज हर प्रकारे प्रयत्नशील बनलेले दिसतात. मोठ्या कुटुंबांसाठी नाना प्रकारचे खास भत्ते, मोठे आकारमान असणा-या कुटुंबांसाठी काही विशेष प्रकारच्या करसवलती, बालवाड्यांच्या सुविधेचा विस्तार, प्रसुती तसेच संगोपनकाळातील रजेसाठी आकर्षक योजना व भत्ते, श्रमांच्या बाजारपेठेतील प्रवेश अधिक लवचीक बनविणे, अर्धवेळ नोकरीच्या संधींमध्ये (मुख्यतः लेकुरवाळ्या महिलांसाठी) वाढ.... असे विविध उपक्रम जोडप्यांसाठी प्रवर्तित केले जात आहेत. आता या सगळ्याचा अपेक्षित परिणाम केव्हा आणि कितपत दिसून येईल, यांबाबत अभ्यासकांना शंकाच आहेत. कारण, मुले होऊ देणे अथवा न देणे हा कमालीचा व्यक्तिगत निर्णय व विषय आहे. केवळ इतकेच नाही तर, मुलांना वाढविणे आज विलक्षण खर्चिक बनलेले आहे. मुख्य म्हणजे या प्रोत्साहक योजनांमुळेही पुन्हा सरकारवरील वित्तीय भार वाढतोच आहे. आता याला काय पर्याय ?

पूर्वीइतक्या सढळ हाताने यापुढे निवृत्तिवेतनादी लाभ पदरात पडणार नाहीत हे ध्यानात घेता, गात्रे पूर्णपणे थकेपर्यंत अर्थार्जन करीत राहण्यावाचून पर्याय नाही, हे जगभरातीलच ज्येष्ठ नागरिकांना आता कळून चुकलेले आहे. ज्येष्ठ नागरिकांच्या निकडीइतकीच जगभरातील श्रमदलांतील प्रचलित परिस्थितीही यास कारणभूत ठरते आहे. पहिले म्हणजे, निवृत्तीनंतरचे आयुर्मान केवळ वाढले आहे इतकेच नाही तर, वैद्यकातील सुधारणांमुळे ते निरोगी आणि कार्यरत राहणेही शक्य बनले आहे. दुसरे म्हणजे, सरासरी जनन दरातील घटीमुळे श्रमदलाचे आकारमान आकुंचन पावण्याची स्थिती उद्‌भवते आहे. तेव्हा, उत्पादक हातांचा उद्योग-व्यवसायांना जाणवणारा तुडवडा भरून काढण्याच्या दृष्टीने ज्येष्ठ नागरिकांच्या श्रमशक्तीकडे अपेक्षेने बघितले जात आहे. तिसरे म्हणजे, केवळ वय वाढल्याने निवृत्त होणा-या कर्मचा-यांच्या रूपाने श्रमशक्तीतून बाहेर जाणारे अनुभवसमृद्ध संचित कौशल्य गमावणे उद्योगांच्या आज जीवावर येताना दिसते. यातून, तरु ण व ज्येष्ठ नागरिकांच्या टीम्स तयार करण्यावर भर दिला जात आहे. भारतामध्ये असा काही विचार कोठे तरी होताना दिसतो का ? इतरांच्या अनुभवांवरू न आपण कधी शिकणार ? ■■

**नागरीकरण**

# वाढती वये, वाढती शहरे

विज्ञान-तंत्रज्ञान आणि विज्ञानविश्वातील नवनवीन शोध हा साराच मोठा विस्मयकारक प्रांत होय. विज्ञानातील शोधांपायी शक्यतेच्या आवाक्यात आलेल्या सुधारणांनी माणसाच्या दैनंदिन जगण्यावर चौफेर परिणाम घडवून आणल्याचे आपण पदोपदी अनुभवतो. वाढते आयुर्मान हा त्याचाच एक पुरावा. विज्ञान-तंत्रज्ञानातील अफाट प्रगतीने सर्वसाधारण प्रगतीला जबरदस्त रेटा पुरविला आहे. मानवी विकासाचा एक मोठा पल्ला उभ्या जगानेच गेल्या वर्षी पार केला. जगभरातील नागरी लोकसंख्या ग्रामीण लोकसंख्येला ओलांडून पुढे निघून गेली, हा तो टप्पा. शहरीकरण आणि त्याचा विस्तार हा एकंदर तांत्रिक-वैज्ञानिक प्रगतीचाच एक आविष्कार. विस्तारणारे शहरीकरण हा शेतीची उत्पादकता, उत्पादन यांतील वाढ व शेतीचा अनेक अंगांनी होणारा विकास, वाहतुकीच्या तंत्रज्ञानातील सुधारणा आणि एकंदरच दळणवळण व संपर्कतंत्रातील क्रांती या तिहेरी प्रवाहांचा एकत्रित परिणाम ठरतो.

परंतु, अस्ताव्यस्त शहरीकरणापायी आज ज्या नानाविध समस्यांना आपल्याला तोंड द्यावे लागते आहे त्यांपायी, शहरीकरण हे सर्वांगीण आर्थिक विकासाचे फलित असते, या प्रतिपादनाचा सरळ स्वीकार करणे अवघड ठरते. शहरांमधील खालावणा-या सर्वसाधारण जीवनमानाच्या प्रश्नाला आता शहरांमधील वयोवृद्धांच्या वाढत्या अडचणींपायी एक नवीनच परिमाण जोडले जात आहे. म्हणजेच, विरोधाभास बघा. वाढते आयुर्मान आणि वाढती शहरे यांची नाळ पुन्हा विज्ञान-तंत्रज्ञानातील सुधारणांशीच जुळलेली आहे. किंबहुना, २१ व्या शतकातील आजच्या जगाला इथून पुढच्या काळात वाढते सरासरी आयुर्मान आणि अव्याहत वाढणारी शहरे या दोन समस्यांचा समांतर सामना करावा लागणार आहे. गंमत म्हणजे या दोन वाढींचाही पुन्हा एकमेकींशी घनिष्ठ नातेसंबंध आहे.



'नातेसंबंध आहे' म्हणण्यापेक्षाही, आजच्या जगात, वाढते सरासरी आयुर्मान आणि वाढणारी शहरे यांची मोठी विचित्र सांगड बसते आहे, असे म्हणणे अधिक संयुक्तिक ठरावे. जगातील विकसित देश असोत वा विकसनशील देश असोत, शहरांची वाढणारी लोकसंख्या ही सगळ्यांचीच मोठी डोकेदुखी बनते आहे. आता, त्याच्याच जोडीने या शहरी लोकसंख्येत वयोवृद्धांचे वाढत असलेले प्रमाण, ही एक नवीनच बाब वेगाने सामोरी येते आहे. वयाची साठी उलटून गेलेल्या नागरिकांचे एकूण शहरी लोकसंख्येतील वाढते प्रमाण हे जगभरातील शहर नियोजनकारांसमोरील उग्र आव्हान बनते आहे. मुळात, मोठ्या शहरांमध्ये होणा-या लोकसंख्येच्या केंद्रीकरणापायी खालावलेल्या शहरी जीवनमानाच्या प्रश्नाने ठिकठिकाणचे नियोजनकार आणि शहरी स्थानिक स्वराज्य संस्था आजच गांजलेल्या आहेत. भरीस भर म्हणून की काय, शहरनियोजनाच्या पारंपरिक मानकांच्या जोडीनेच आता, शहरी वयोवृद्धांच्या गरजा आणि अडचणींचे यथायोग्य भान ठेवूनच आगामी काळातील नियोजन करावे लागणार आहे. जगातील श्रीमंत आणि प्रगत देशांमध्ये त्या मानाने या बाबत ब-यापैकी जागृती झालेली असल्याने तिथे या संदर्भात निदान गंभीरपणे विचारविनिमय तरी चालू असलेला दिसतो. मागास देशांमध्ये मात्र साराच आनंदीआनंद आहे !

इथेही पुन्हा एक भयानक विरोधाभास दिसतोच. कारण, या सगळ्या बदलांमुळे या देशांतील शहरांचीच अवस्था भविष्यात मोठी बिकट बनणार आहे. मात्र, शहरी लोकसंख्येच्या वाढीतील या सूक्ष्म परंतु संवेदनशील बदलाचे उचित भान तेथील राज्यकर्ते आणि शहरनियोजनकार यांना आहे किंवा कसे यांबाबत शंका वाटण्याजोगेच सारे चित्र दिसते. २००५ सालासाठीच्या आकडेवारीनुसार, जगभरातील एकंदर वयोवृद्धांपैकी सुमारे ६० टक्के वयोवृद्ध विकसनशील देशांमध्ये सामावलेले होते. येत्या ५० वर्षांत हेच प्रमाण थेट ८० टक्क्यांवर जाण्याची शक्यता वर्तविली जात आहे. १९९८ साली सहा कोटींच्या घरात असणारी वयोवृद्धांची संख्या २०५० सालापर्यंत ९१ कोटींपर्यंत फुगण्याची चिन्हे दिसत आहेत. त्या वेळी विकसनशील देशांमधील नागरी लोकसंख्येत वयोवृद्धांचे प्रमाण २५ टक्क्यांवर गेलेले असेल.

शहरी लोकसंख्या वाढीइतकाच या सा-या गुणात्मक बदलांचा संबंध शहरांची भौगोलिक रचना, विस्तारणा-या सीमा, शहरांतर्गत बांधकामे, त्या बांधकामांचा प्रकार, नागरी सुविधा, पायाभूत शहरी सेवा व सोयी, रस्ते व पदपथांची आखणी, शहरी वाहतूक, वाहतुकीची साधने आणि रस्तेवापर, मोकळ्या जागा, क्रीडांगणे, ज्येष्ठ नागरिकांसाठी विरंगुळ्याची ठिकाणे, 'पार्किंग'साठी रिकाम्या जागा... अशा अक्षरशः अगणित बाबींशी असणार आहे. शहरांमधील भू-वापर, 'झोनिंग', पायाभूत नागरी सुविधांचे डिझाइन आणि त्यांचा पुरवठा यांत शहरातील ज्येष्ठ नागरिकांचे वय हे 'व्हेरिएबल' अथवा परिमाण सजग संवेदनशीलतेने अंतर्भूत केले जाते अथवा नाही यांवर शहरी वयोवृद्धांचे घराबाहेरील हिंडणे-फिरणे, वावर, वावराचे स्वातंत्र्य आणि पर्यायाने त्यांच्या राहणीमानाचा दर्जा अवलंबून राहील. आजमितीस शहरांमध्ये वास करणा-या वयोवृद्धांच्या या संदर्भातील अडचणी व समस्या काय आहेत, यांचा अभ्यास करणे म्हणूनच महत्त्वाचे ठरते. या पाहणीतून सामोरे येणारे चित्र सर्वच संबंधितांना अंतर्मुख बनविणारे असेच आहे.

इथे, शहरांमधील भौतिक सोयीसुविधांइतकेच शहरांमधील पर्यावरणही महत्त्वाचे ठरते. शहरांमधील रस्त्यांवरील स्वच्छता, शुद्ध व शांत पर्यावरण, परिसरातील शांतता यांसारख्या बाबींना शहरांत राहणा-या ज्येष्ठ नागरिकांच्या लेखी प्राधान्य असते. शहरांमधील चित्रविचित्र आवाज आणि गोंगाटाची पातळी हा शहरी पर्यावरणाचा एक लक्षणीय घटक ठरतो. शहरांमध्ये वाहनांच्या होणा-या केंद्रीकरणामुळे म्हाता-या व्यक्तींना रस्त्यावरून सुरक्षितपणे चालणे-फिरणेच अशक्य बनते इतकेच केवळ नाही तर, त्यांचे कर्णकर्कश भोंगे आणि आवाज यांमुळे त्यांची झोपही उडते. पूर्वी सकाळी सहा वाजेपर्यंत निवांत झोपता येत असे. परंतु, आता मात्र रस्त्यावर वाहनांची वर्दळ आणि बाकीचे इतके आवाज भल्या पहाटेच सुरू होतात की, चार वाजताच जाग येते, ही इस्तंबुलमधील एका ज्येष्ठ नागरिकाची तक्रारवजा व्यथा पुरेशी प्रातिनिधिक ठरते. तर, वाहनांमधून सोडल्या जाणा-या धुरासकट अन्य धुरांपायी आणि त्यांच्या वासापायी प्रसंगी श्वासही कोंडतो अशी वेदना त्रिपोलीतील वयोवृद्ध व्यक्त करतात.



शहरांमधील ध्वनिप्रदूषणास रस्त्यांवरील वाहनांचे आवाज हाच काय तो एकमात्र घटक कारणभूत नसतो. पदपथांवरील टप-या व दुकानांमधील रेडिओंचे कानठळ्या बसविणारे आवाज आणि त्यांच्या जोडीनेच त्या गाण्यांमधील उत्तान शब्द तनमनाची शांती ढळवितात, अशी जमेकातील ज्येष्ठांची व्यथा आहे. रस्त्यांवरील आवाजाची पातळी नियंत्रित करणारी बंधने जारी करून त्यांची काटेकोर अंमलबजावणी करण्याबाबत त्यांची आग्रहाची मागणी आहे. तर, शहराचे आरोग्य शाबूत राखण्यासाठी 'स्वच्छ रस्ते' मोहीम राबविण्याची मेक्सिकोतील वयोवृद्धांची शिफारस दिसते. शहरी पर्यावरणाचाच दुसरा घटक म्हणजे मोकळ्या जागा आणि हरित पट्टे. शहरांमध्ये होणा-या लोकसंख्येच्या केंद्रीकरणापायी मोकळ्या जागांचा इंच न् इंच निवासी तसेच व्यावसायिक उपयोगासाठी वापरला जाण्याची प्रवृत्ती सर्वत्रच वाढताना दिसते. परिणामी, संध्याकाळी जरा पाय मोकळे करता येतील असे हिरवे पट्टेच शहरांतून गायब होत आहेत, हे अनेक देशांमधील ज्येष्ठांचे दुःख आहे. हरित पट्टे हे जणू कचरा फेकण्याचे हक्काचे ठिकाण बनत असल्याची दिल्लीकरांची खंत आहे.

वृद्धांना चार घटका समवयस्कांबरोबर व्यतीत करता येण्यासाठी शहरांमध्ये बागा व उद्याने असावीत, ही देशोदेशीची किमान अपेक्षा दिसते. शहरात उद्याने आहेत पण रस्त्यांवरील एकंदरच बेशिस्तीपायी तिथपर्यंत पोहोचणेही दुरापास्त बनते आहे, असे उदयपूरमधील सेवानिवृत्तांचे शल्य. बागा-उद्यानांमध्ये सर्व वयोगटातील नागरिकांची गर्दी असते. त्यातच लहान मुलांचे खेळ व पळापळीही चालूच असते. हे कमी झाले म्हणून की काय, येणारे काही जण आपल्याबरोबर पाळीव कुत्रेही घेऊन येतात ! तेव्हा शहरातील वयस्करांसाठी खास अशी उद्याने राखीव करावीत, अशी भावनावजा मागणी अनेक देशांमधून मुखर होताना दिसते. तर, उद्यानांमध्ये 'मॉर्निंग' वा 'इव्हिनिंग वॉक'साठी येणा-या वयोवृद्धांसाठी निदान 'पार्किंग' तरी राखीव असावे, अशी दिल्लीकरांची व्यावहारिक शिफारस आहे. फेरफटका मारणा-या वयस्करांना अंमळ टेकावेसे वाटले तर उद्यानांमध्ये बसण्यासाठी आसनांची व्यवस्थाही बरेचदा नसते. असेलच तर तिच्यावर अन्य कोणी तरी अतिक्रमण केलेले असते. ***(पान ३२ वर)***

आर्थिक

# ‘बाहेरून येणारे’ करतात तरी काय ?

माणूस देशाटन का करतो...?... संभाव्य उत्तरे अनेक असली तरी ‘पोटासाठी’ हे त्या मागील एक मुख्य कारण (कदाचित सर्वांत महत्त्वाचे) असतेच असते. अनादी काळापासून हेच चालत आले आहे. आदिम काळात तर भटकंतीशिवाय पर्यायच नव्हता. आज २१व्या शतकातही ‘चालत राहा, चालत राहा’, हा मंत्र माणूस घोकतोच आहे. पूर्वीच्या पिढ्यांतील बुजूर्गांना विचारले तर, देशाटन केल्याने माणसाच्या अंगी चातुर्य बाणते, अशी देशांतराची महती सांगितली जायची. आजही ते तितकेच खरे आहे. घराचा उंबरा ओलांडून बाहेर पडणा-या पावलांना चातुर्य संपादनाच्या दिशांची ओळख होण्याबरोबरच हातांना कौशल्यांचा साज चढून रोजीरोटी कमावण्याचे शहाणपणही त्या चातुर्यापाठोपाठच येते. स्थलांतराबाबतच्या अभ्यासांचा निष्कर्ष जवळपास हाच आहे. स्थलांतरामागील प्रेरणांत स्थल-काल-व्यक्तीपरत्वे फरक दिसून येत असले तरी मुख्य प्रेरणा ही उपजीविकेचीच असते, हे या सा-या संशोधनांती प्रकट झालेले वास्तव आहे.

असे असले तरीही, खेड्यांमधून मोठ्या शहरांकडे वळणारे अथवा लहान शहरांकडून महानगरांकडे धांव घेणारे हे स्थलांतरित शहरांमध्ये नेमक्या कोणत्या प्रकारचा रोजगार कमावतात, श्रमांच्या शहरी बाजारपेठेत ते कोठे सामावून घेतले जातात, स्थलांतर केल्याने त्यांच्या आर्थिक स्थितीमध्ये नेमका काय फरक पडतो... यांसारख्या काही महत्त्वाच्या प्रश्नांबाबतचे आपले आकलन मात्र आजही तसे अपुरेच आहे. असा अभ्यास करणे हे अतिशय जिकिरीचे असते, हे यामागील मुख्य कारण. त्यामुळे, ‘स्थलांतरित’ आणि ‘स्थानीय’ अशा दोन समाजसमूहांच्या नमुना पाहणीवर आधारित जी काही आकडेवारी आपल्या देशात उपलब्ध होते तिच्या निष्कर्षांवरच या साठी अवलंबून राहणे भाग पडते. दुधाची तहान ताकावर भागविण्याचाच हा प्रकार !



भाकरीच्या शोधात शहरांकडे वळणारे स्थलांतरित शहरांतर्गत श्रमांच्या बाजारपेठेत नेमके कोठे आपला शिरकाव करून घेतात हे मुख्यतः दोन बाबींबर अवलंबून राहत असावे, असे उपलब्ध होणा-या संशोधनावरून दिसते. घरातून उठून बाहेर पडणारा स्थलांतरित ‘ग्रामीण’ आहे की ‘शहरी’ हा झाला त्यांतील एक घटक. दुस-या शब्दांत सांगावयाचे तर, स्थलांतरण हे ‘ग्रामीण भागांतून शहराकडे’ या गटातील आहे की, ‘शहराकडून शहराकडे’ या प्रकारातील आहे, हे या संदर्भात महत्त्वाचे ठरते. त्याचप्रमाणे, ज्या शहरामध्ये स्थलांतरित रोजगाराच्या शोधार्थ येतो त्या शहराचे आकारमान हाही दुसरा घटक यात तितकीच कळीची भूमिका बजावतो. रोजीरोटीचा शोध घेत शहरांमध्ये आलेले स्थलांतरित आणि स्थानीय यांचा तौलनिक अभ्यास इथे करणे उपयुक्त ठरते. विविध आकारमानांच्या शहरांमधील विविध रोजगार क्षेत्रांत काम करणा-यांमध्ये स्थलांतरितांचे प्रमाण किती आणि स्थानिकांचे प्रमाण किती, या बाबतची आकडेवारी बघितली की याचा उलगडा होतो.

राष्ट्रीय नमुना पाहणी संघटनेने १९९९-२००० या वर्षासाठी संकलित केलेली सांख्यिकी अभ्यसनीय आहे. देशातील नागरी विभागांचे या पाहणीमध्ये एकूण तीन गटांत विभाजन करण्यात आलेले दिसते. ५० हजारांपर्यंत लोकसंख्या असणा-या लहान नागरी विभागांचा एक गट. ५० हजारांपेक्षा अधिक परंतु १० लाख वा त्यापेक्षा कमी लोकसंख्या असणा-या नागरी विभागांचा दुसरा गट. आणि १० लाख वा त्यापेक्षा अधिक लोकसंख्या असणा-या महानगरांचा तिसरा गट. गंमत अशी की, या तीनही गटांतील शहरांमध्ये ‘ठोक व्यापार’ हे रोजगार वा व्यवसायाचे क्षेत्र असे आहे की या क्षेत्रात रोजगार मिळालेल्यांमध्ये स्थानिकांचे तौलनिक प्रमाण हे स्थलांतरितांपेक्षा चांगले लक्षणीयरीत्या अधिक आहे. तर, ‘वस्तुनिर्माण उद्योग’ आणि विविध प्रकारचे ‘सेवा उद्योग’ या दोन क्षेत्रांत नोकरी/रोजगार मिळविण्यात स्थानिकांच्या तुलनेत स्थलांतरितांचे प्रमाण तीनही लोकसंख्या गटांतील शहरांमध्ये अधिक दिसते. १० लाख वा त्यापेक्षा अधिक असलेल्या शहरांमध्ये स्थलांतरितांचे तौलनिक प्राबल्य असलेली आणखी दोन रोजगार क्षेत्रे म्हणजे ‘बांधकाम’ आणि ‘वाहतूक’.

स्थलांतरितांची पार्श्वभूमी बघितली तर आणखीनच मजा दिसते. सर्वच शहरांमधील स्थलांतरित मुख्यतः वस्तुनिर्माण उद्योग आणि सेवा क्षेत्रांत सामावून घेतले जात असले तरी, देशाच्या ग्रामीण भागांतून शहरांकडे वळणारे स्थलांतरित हे खास करून वस्तुनिर्मिती वा वस्तुउत्पादन उद्योगांमध्ये रोजगार शोधतात, याच क्षेत्रांत ते स्थिरावतात असा या पाहणीचा निष्कर्ष आहे. तर, आहे त्यापेक्षा अधिक चांगल्या नोकरी-रोजगाराच्या शोधार्थ लहान शहरांमधून मोठ्या शहरांकडे अथवा महानगरांकडे पावले वळविणारे स्थलांतरित हे बहुतांशी व्यावसायिक आणि/किंवा तांत्रिकी सेवांमध्ये शिरकाव करून घेतात, असे संबंधित आकडेवारीवरून दिसून येते. आपल्या गावातून उठून प्रथम लहान शहरात नोकरी/रोजगार शोधून संधी मिळताच मोठ्या शहराकडे धांव घेणारे स्थलांतरित टप्प्याटप्प्याने स्थलांतरण करण्याचा हा पर्याय स्वीकारतात आणि देशांतराच्या प्रत्येक स्तरावर आपल्या अंगभूत कौशल्यांमध्ये भर घालत जातात. ही प्रक्रिया सर्वत्रच दिसते. परिणामी, महानगरांमधील श्रमांच्या बाजारपेठेत असे स्थलांतरित जेव्हा येऊन दाखल होतात तेव्हा त्यांच्या अंगी असणारी संचित कौशल्यांची पुंजी चांगलीच बाळसेदार झालेली असल्याने तुलनेने उच्च व्यावसायिक दर्जाच्या कौशल्यांची मागणी करणा-या क्षेत्रांत त्यांचा प्रवेश सुकर बनतो, हे यामागील एक संभाव्य कारण.

आर्थिक उन्नतीचा पर्याय म्हणून जेव्हा स्थलांतराकडे बघितले जाते तेव्हा स्थलांतरण आणि गरिबीशी मुकाबला या दोन बाबींचा परस्परसंबंध तपासणे कुतूहलाचे ठरते. या संदर्भातील आकडेवारी तर फारच उद्‌बोधक आहे. १० लाख वा त्यापेक्षा अधिक लोकसंख्या असणा-या शहरांमधील स्थानिक पुरुषांमध्ये दारिद्र्य रेषेखाली जीवन कंठणा-यांचे प्रमाण सरासरीने २१ टक्क्यांच्या जवळपास असल्याचे दिसते. परंतु, ग्रामीण भागांतून शहरांच्या याच गटात प्रवेशलेल्या पुरूष स्थलांतरितांमध्ये हेच प्रमाण १६ टक्के इतके तर, अन्य एखाद्या नागरी विभागातून आलेल्या स्थलांतरितांमध्ये ते केवळ पाच टक्के इतकेच असल्याचे संबंधित सांख्यिकी सांगते.

आता सांगा ! का नाही लोक मोठ्या शहरांकडे धावणार ? मग, कोणतीही 'सेना' काहीही म्हणो !! ■■



*(पान २८ वरून)*

शहरांतर्गत पदपथांवर फेरीवाल्यांनी केलेले अतिक्रमण ही अक्षरशः वैश्विक समस्या होय. पुणे, मुंबई, दिल्लीपासून ते मेक्सिको, रिओ दि जानेरिओ, जमेकापर्यंत सर्वत्र हाच अनुभव. मॉस्कोमध्ये तर पदपथांवरच चारचाकीही उभ्या केलेल्या. त्यांतच, बर्फवृष्टी होणा-या देशांमधील ज्येष्ठांना, बर्फ पडून गेल्यानंतर पदपथांवर साचलेले बर्फ लगोलग दूर केले गेले नाही तर घरात कोंडून घेण्याखेरीज पर्यायच उरत नाही. कारण, बर्फामुळे गुळगुळीत झालेल्या पदपथावरून पाय घसरण्याचाच धोका मोठा.

शहरोशहरीच्या वृद्धांच्या समस्यांमध्ये बव्हंशी एकवाक्यता दिसते. फरक आढळून येतो तो ठिकठिकाणच्या शहर व्यवस्थापकांच्या संवेदनशीलतेच्या पातळीत. ■■

## निवेदन

'अर्थबोधपत्रिके'मध्ये प्रकाशित करण्यासाठी संशोधनपर लेखन भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीकडे सादर करण्याकडे अलीकडील काळात कल वाढलेला दिसतो. जाणकार, विचक्षण वाचकांना 'पत्रिके'बाबत वाटणा-या आत्मीयतेची, 'अर्थबोधपत्रिके'च्या विश्वसनीयतेची, संशोधनपर वाचनसाहित्याला वाहिलेले गंभीर प्रकृतीचे एक नियतकालिक या 'अर्थबोधपत्रिके'च्या प्रतिमेची जणू पावतीच त्याद्वारे मिळते. मात्र, अशा या लेखनसाहित्याचा अंतर्भाव 'पत्रिके'च्या अंतरंगात करण्यास आम्ही असमर्थ आहोत, याबद्दल सखेद दिलगिरी व्यक्त करण्याखेरीज पर्यायही नाही. एक तर, भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी या संस्थेत कार्यरत असलेल्या संपादकीय विभागाने खास 'अर्थबोधपत्रिके'साठीच तयार केलेल्या मजकुराखेरीज अन्य मजकूर अंकात अंतर्भूत करावयाचा नाही, असे धोरण संस्थेने 'पत्रिके'च्या प्रारंभापासूनच जपलेले आहे. तसेच, देश वा राज्य पातळीवरील प्रचलित विषयांचा ऊहापोह करणारे संशोधनपर लेखन प्रकाशित करणारे संशोधनविषयक नियतकालिक, असे 'अर्थबोधपत्रिके'चे स्वरूपही संस्थेस आरंभापासूनच अभिप्रेत नाही. त्यामुळे, प्रकाशन हेतूने संस्थेकडे सादर करण्यात येणारे लेखन स्वीकारण्यास आम्ही असमर्थ आहोत. 'अर्थबोधपत्रिके'वर प्रेम करणारे वाचक संस्थेची ही भूमिका समजावून घेतील, त्याबाबत त्यांचा कोणताही विपरित ग्रह होणार नाही, अशी आशा नव्हे तर खात्री आहे. लोभ आहेच तो उत्तरोत्तर वृद्धिंगत व्हावा, हीच मनःपूर्वक प्रार्थना.

## जिकडे-तिकडे

# ‘सुपर-सैनिक ’

एकीकडे, ‘युद्ध नको’ अशी एक सर्वसाधारण भूमिका अनेकानेक देशांमधील विविध व्यासपीठांवरून कधी पुढे येताना दिसते तर, दुसरीकडे, युद्ध झाले तर....‘आपली तयारी असलेली बरी’, असा विचार व कृतीही घडून येताना दिसते. स्वाभाविकच युद्धासाठी लष्कर सुसज्ज असणे यालाही महत्त्व मिळते. यासाठी विज्ञान-तंत्रज्ञानाचा उपयोग मोठ्या प्रमाणावर केला जात असून अलीकडे आधुनिक मेंदू संशोधनाचा व जनुकीय संशोधनाचा उपयोग या संदर्भात केला जात आहे. त्यामुळे सैनिक आता ‘सुपर-सैनिक’ बनत आहेत. सैनिकांजवळ नेहमी असणा-या साधनसामग्रीत अधिकाधिक सोयी उपलब्ध होऊन ही साधने तर अधिक उपयुक्त बनतीलच. त्याशिवाय, सैनिकांचे मनोधैर्य उंचावणा-या काही गोष्टी करता येणेही शक्य होईल. अमेरिकेतील संशोधक या संशोधनात आघाडीवर आहेत.

नवनवीन तंत्रज्ञानामुळे युद्धाच्या क्षेत्रातही बदल होत असून शारीरिक क्षमता सिद्ध करणारे धष्टपुष्ट व बळकट शरीर हा एकमेव निकष लावणे येथून पुढे अपुरे ठरेल, असे आता म्हटले जाऊ लागले आहे. उदाहरणार्थ, युद्धभूमीवर नव्या तंत्रज्ञानाचा वापर करताना हात व डोळे यांच्यातील समन्वयात्मक कार्य व नेमक्या हालचाली यांना महत्त्व मिळू लागले आहे. त्यामुळे शारीरिक जडणघडणीप्रमाणेच अशा कौशल्यांचेही महत्त्व अधोरेखित होत आहे. त्यामुळे लष्करात भरती करण्यासाठी येथून पुढे जनुकीय व मेंदूच्या कार्यपद्धतीविषयक चाचण्या महत्त्वाच्या ठरण्याची लक्षणे आहेत. काही सैनिक अनेक प्रकारचे प्रशिक्षण पूर्ण करू शकतात/करतात. तथापि, एखाद्या विशिष्ट प्रकारचे प्रशिक्षण पूर्ण न करू शकण्यामागे त्यांच्या मेंदूची रचना कारणीभूत ठरू शकते का, याचाही शोध घेण्यात येत आहे. तसेच, प्रशिक्षणातील नव्या संकल्पना सैनिकांना पूर्णपणे समजल्या आहेत किंवा नाहीत हेही समजून घेणे गरजेचे असून त्यासाठीही मेंदूसंशोधनाची मदत



घेण्यात येत आहे. सैनिकांच्या क्षमतांनुसार त्यांना योग्य प्रशिक्षण देऊन त्यानुसार त्यांची नियुक्ती करता येईल, असेही सुचविण्यात येत आहे. या संशोधनांचा उपयोग करून आता एखाद्या विशिष्ट कामासाठी ‘सुपर-सैनिकां’ची टीम तैनात करता येईल. ‘सुपर-सैनिकां’ची निवड करताना त्यांच्या जनुकीय रचनेनुसार कोणत्या कार्यासाठी कोण अधिक सुयोग्य ठरेल, याचा विचार करून सैनिकांना कामाचे वाटप करता येईल. तसेच, सैनिकांमधील त्रुटी व कमकुवत बाजू सतत विचारात घेतल्या जातील. उदाहरणार्थ, सैनिकांची निवड करताना जनुकीय रचना विचारात घेतली जाईल, त्याच वेळी त्यांच्या मेंदूविषयक तसेच मानसशास्त्रीय तपासण्याही झालेल्या असतील. त्या वेळी समजा असे आढळले की, युद्धात ताणग्रस्त परिस्थितीत त्यांच्या क्षमता कमी होत आहेत, तर, हा ताण कमी करण्यासाठी मेंदूत कार्यरत असणा-या सिरोटोनिन या हॉर्मोनचे प्रमाण वाढावे असे औषध देता येईल. सहानुभूती, सहसंवेदना यासाठी मेंदूतील ऑक्झिटोसिन हे हॉर्मोन महत्त्वाची भूमिका बजावते. अशी भावना निर्माण झाल्याने शत्रुसैन्याप्रती दया निर्माण हौऊन काही सैनिक शत्रुसैनिकांना मारण्यास कचरू शकतात, म्हणून अशा सैनिकांच्या या विशिष्ट भावना नियंत्रणात राहण्यासाठी ऑक्झिटोसिनचा मार्ग खंडित करता येईल का, असेही संशोधन चालू आहे. पण, याचबरोबर असे करणे नैतिक ठरेल का, याचाही विचार करणे गरजेचे आहे, असे मत संशोधक मांडतात.

या शिवाय, सैनिक ‘सुपर-सैनिक’ बनावेत यासाठी सैनिकांनी हातावर घालायचे एक विशिष्ट उपकरणही आहे. या द्वारे त्यांना यंत्रमानवाच्या संपर्कात राहता येईल. भोवतालच्या पर्यावरणात काही अनिष्ट बदल घडून येत असल्यास त्यांची पूर्वसूचना त्यांना मिळू शकेल. पायाच्या स्नायूंना अधिक शक्ती मिळावी म्हणून, तसेच गुडघ्याच्या खालच्या पायांच्या सुरक्षिततेसाठी नॅनोटेक्नॉलॉजीच्या मदतीने बनविण्यात आलेली विशिष्ट साधनेही त्यांना उपलब्ध होऊ शकतात. युद्धाशी संबंधित अशा प्रकारच्या कोणत्याही तंत्रज्ञानाचा/साधनांचा दुरुपयोग होण्याची शक्यता संशोधक नाकारत नाहीत. प्रेमात आणि युद्धात सारे काही क्षम्य, असे म्हणतात. म्हणून सैनिकांना ‘सुपर-सैनिक’ बनविणे उचित ठरेल का? ■■

*(पृष्ठ १० वरून)*

नागरिकांचे मत पुढे आले आहे. आपली ओळख 'तैवानी' व 'चिनी' अशी दोन्ही प्रकारची असावी, असे सर्वेक्षण केलेल्यांपैकी सुमारे ४४ टक्के तैवानी नागरिकांना वाटते. तर, आपली ओळख फक्त 'तैवानी' अशी हवी, असे ४९ टक्के नागरिकांना वाटते. आपली ओळख फक्त चिनी असावी असे केवळ तीन टक्के नागरिकांना वाटते. चिनी नागरिकांना मात्र तैवानशिवाय चीन हा सामर्थ्यशाली वाटत नाही.

चिनी नेत्यांची तैवानबाबतची भूमिका बदलत गेली आहे, हेदेखील येथे लक्षात घेणे गरजेचे आहे. क्विंग राजघराण्याच्या काळात तैवानला चीनचा भाग मानण्याबाबत संभ्रम होता. माओ-त्से-तुंग यांनी तैवान स्वतंत्र देश असावा असे मत मांडले होते. तर, चीन व तैवान येथील नागरिक वंशाने व संस्कृतीने एक असल्याने राजकीयदृष्ट्या चीन व तैवान एकत्र आहेत किंवा नाहीत हे महत्त्वाचे ठरत नाही, असे मत १९४९नंतर साम्यवादी राजवटीने पुढे आणले असण्याची शक्यता अभ्यासक बोलून दाखवतात. पण चिनी नागरिकांचे मत लक्षात घेऊ नच चीनच्या नेतृत्वाला तैवानचा मुद्दा दूर ठेवता आलेला नाही असे दिसते, अशी पुष्टी ते जोडतात. चीनमध्ये लोकशाही प्रस्थापित होईल किंवा नाही हे सांगणे अवघड असले तरी चिनी नागरिकांच्या मतांचे प्रतिबिंब चीनच्या परराष्ट्रविषयक धोरणांत दिसून येते असे या दोन उदाहरणांवरू न दिसून येते.

प्रसंगी संघर्षाकडे जाऊ शकणा-या चीनच्या परराष्ट्रविषयक धोरणांना चिनी नागरिकांचा पाठिंबा आहे कारण, देशाची ऐतिहासिक थोरवी आणि प्रखर राष्ट्रवाद तेथे महत्त्वाचा ठरतो. या शिवाय आधुनिक काळात आंतरराष्ट्रीय पातळीवर चीनला मिळालेली सात्पन्न वागणूक ही देखील चिनी नागरिकांच्या लेखी महत्त्वाची बाब ठरते. तसेच, चिनी नेते लोकनिर्वाचित नसले तरी ते (कदाचित त्यांच्या सोयीनुसार) जनमताची दखल घेतात, हे समजून घेतले पाहिजे. या पार्श्वभूमीवर, चीनमध्ये लोकशाहीकरणाची प्रक्रिया चालू होईल, असा आशावाद ठेवला तरी चीनच्या परराष्ट्रधोरणावर प्रखर राष्ट्रवाद आणि देशाची ऐतिहासिक थोरवी यांचा प्रभाव दिसून येईल, असे अभ्यासकांना वाटते. ■■



*(पृष्ठ १४ वरून)*

अमेरिकेचे अलीकडचे माजी राष्ट्राध्यक्ष जॉर्ज बुश (ज्युनियर) यांची धोरणे ही पठडीबद्ध, काही विशिष्ट मुद्यांवर विशिष्ट देशांना मदत करणारी अशी होती. लॅटिन अमेरिकेच्या संदर्भात लोकशाहीव्यवस्था बळकट करणे, आर्थिक विकास घडून येण्यासाठी साहाय्य करणे, मनुष्यबळात गुंतवणूक आणि सुरक्षाविषयक घडामोडींच्या संदर्भात मदत करणे असे अमेरिकेचे धोरण राहिले होते. लॅटिन अमेरिकेतील देशांमध्ये परस्परसहकार्य वाढावे यावर अमेरिकेने भर दिल्याचे दिसत नाही. त्यातही, सुरक्षेचा मुद्दा विचारात घेता अमेरिकेने नेमके काय करायचे हे स्पष्ट केले नाही. शिवाय, एकूणच, १९९०च्या दशकापासून अमेरिकेसमोर जागतिक दहशतवादासंबंधीचे वेगवेगळे प्रश्न उभे ठाकले. त्यातच, अमेरिका-इराक युद्धामुळे अमेरिकेला टीकेला सामोरे जावे लागले होते. शिवाय, अमेरिकाविरोधी भावना वाढीस लागल्याने अमेरिकेतील मुत्सद्दी सचिंत बनले होते. दरम्यानच्या काळात, लॅटिन अमेरिकेतील घडामोडींबाबतचा अमेरिकेचा रस कमी झाल्याने अमेरिकेने लॅटिन अमेरिकेतील देशांबाबत गांभीर्याने विचार केला नाही, असे अभ्यासकांचे मत झाले आहे. पण आता अमेरिकेत अध्यक्ष बराक ओबामा यांची कारकीर्द चालू झाल्याने त्यांच्याकडून लॅटिन अमेरिकेतील देशांच्या अपेक्षा आहेत. अमेरिकेतील व इतर देशांमधील आर्थिक परिस्थिती, बेरोजगारी व इतर प्रश्न इत्यादी अनेकानेक बाबींचा विचार करून सहकार्याचे धोरण स्वीकारणे ही सोपी गोष्ट नक्कीच नाही. अशी धोरणे स्वीकारताना अमेरिकेला आपली वर्चस्ववादी भूमिका बाजूला ठेवावी लागेल. केवळ अमेरिकेच्याच हिताच्या असलेल्या बाबींना प्राधान्य देण्याचा विचार बाजूला ठेवावा लागेल. सामायिक मूल्य (शेअर्ड व्हॅल्यू) हे येथून पुढे महत्त्वाचे ठरेल. त्यामुळे अमेरिकेचे विद्यमान अध्यक्ष बराक ओबामा यांच्यापुढे ही आव्हानाची परिस्थिती उभी ठाकली आहे. असे या क्षेत्रातील जाणकारांना वाटते.

लॅटिन अमेरिकेतील व कॅरेबियन देशांसंबंधीची आपली धोरणे अमेरिकेने बदलावी असे अमेरिकेतीलच अभ्यासकांना वाटते आहे. म्हणूनच 'वी कॅन चेंज' अशी घोषणा देणारे ओबामा या संदर्भात 'कॅन वी चेंज ?' या भूमिकेपर्यंत येतील का, हे पाहणे औत्सुक्याचे ठरेल. ■■

## प्रमुख संदर्भ

**(A) Magazines :**

(1) Survival, vol 51 no. 2, April-May 2009, pp.25-40

(2) Current History, February 2009

(3) New Statesman, 27 April 2009

(4) New Scientist 23 May 2009

(5) The Economist, June 27-July 3 rd 2009

**(B) Books :**

(6) INDIA Urban Poverty Report 2009, Ministry if Housing and Urban Poverty Alleviation Governnment of India, Oxford University Press, 2009

(7) Global age-friendly Cities: A Guide: World Health Organization, Ageing and Lifr Course, Family and Community Health, 2007

**(C) Websites :**(8) www.columbia.edu

(9)journals.cambridge.org


■■


## भेट अंक योजना

'अर्थबोधपत्रिका' या उपक्रमात सहभागी झाल्याबद्दल आपले आभार. यात आपल्यासारख्या अनेकांचा सहभाग वाढावा, यासाठी आम्ही आपल्याकडून एक छोटी मदत मागत आहोत. 'अर्थबोधपत्रिका' आपल्यासारख्याच आणखी काही उत्सुक व्यक्तींपर्यंत पोचण्यासाठी आपणास विनंती अशी की, आपण आपल्या परिचयातील वाचनोत्सुक अशा व्यक्तींची नावे व पत्ते आम्हाला लेखी कळवावीत. म्हणजे आम्ही त्यांना एक 'भेट अंक' पाठवू. अंक आवडल्यास त्यांना 'पत्रिके'चे वाचक बनण्याबरोबरच संस्थेच्या समृद्ध ग्रंथालयाचाही लाभ घेता येईल.

**'अर्थबोधपत्रिके'च्या सदस्यांसाठी वाचनसंधी**

भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी या संस्थेच्या संदर्भ ग्रंथालयात सामाजिक, आर्थिक, राजकीय व अन्य विषयांवरील सुमारे बारा हजारांवर उत्तमोत्तम ग्रंथ आहेत. केवळ इतकेच नाही तर, इकॉनॉमिस्ट, डाउन टू अर्थ, करंट सायन्स, इकॉनॉमिक ॲन्ड पोलिटिकल वीकली यांसारख्या विख्यात नियतकालिकांचे गेल्या अनेक वर्षांचे अंकही संग्रहात आहेत. 'अर्थबोधपत्रिके'च्या सदस्यांना या संदर्भ ग्रंथालयाचा लाभ विनामूल्य घेता येईल. या वाचनसंधीबाबत अधिक तपशीलासाठी व्यवस्थापकांकडे चौकशी करावी.





**भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीचे आद्य प्रकाशन**
**आता पुनर्मुद्रित स्वरूपात**

**भारतातील गरिबीच्या समस्येचे स्वरूप तिच्या कारणांसह तपशीलवार उलगडून दाखविणारा दस्तऐवज**

# Poverty in India

**लेखक**

वि.म. दांडेकर　　नीळकंठ रथ

पृष्ठे १४०　　किंमत : २००/- रुपये

**अर्थकारण-समाजकारणाचे जिज्ञासू, साक्षेपी संशोधक, प्राध्यापक, विद्यार्थी अशा विविध स्तरांतील वाचकांना उपयुक्त असा मौलिक ग्रंथ**

## 'अर्थबोधपत्रिका' वर्गणीदारांसाठी विशेष योजना

**( १ जून २००६ पासून)**

**वार्षिक वर्गणी　　फक्त १०० / - रुपये**

**द्वैवार्षिक वर्गणी　फक्त १८० / - रुपये व 'अर्थबोधपत्रिके'चा मेंदूसंशोधन विशेषांक भेट**

**त्रैवार्षिक वर्गणी　फक्त २६० / - रुपये व एक पुस्तिका भेट**

**पंचवार्षिक वर्गणी　फक्त ४०० /- रुपये व दोन पुस्तिका भेट**

**पुस्तिका -** (१) भारतातील लोकसंख्यावाढीचा प्रश्न : लेखिका - कुमुदिनी दांडेकर (किंमत ३०/-रुपये) (२) सक्तीचे प्राथमिक शिक्षण : (इंग्रजी व मराठी) लेखक - जयकुमार अनगोळ (दोन्हीची किंमत ३०/-रुपये प्रत्येकी) (४) शोध घेते ते शिक्षण : लेखक - प्रा. रमेश पानसे (किंमत -५०/-रुपये) (५) मेंदूसंशोधन विशेषांक ( किंमत ४०/-रुपये)